अधिक सुरक्षित होत होती. निश्‍चित होत होती. एवढे लाड आपले जन्मांत कोणीं केले नव्हते असें तिचें तिलाच वाटे. जगांत एवढ्या प्रेमानें कोणी वागूं शकतें ह्यावर तिचा आतांशा विश्वास बसत चालला होता. अगदीं सगळें नवेंच घडत चाललें होतें, नवेच दिवस येत होते. कोणी तरी रोज येत होतें आणि नवें कांहीं तरी लिहीत होतें. कोणी तरी पावलें न वाजवितां हवेंतून येई आणि हवा मोठी प्रसन्न, सुगंधित करून जाई. कोणचा तरी हात हलक्या हातानें कालावरचे आजपर्यंतचे चरे, वेडेवांकडे ठसे पुसून टाकी आणि चकचकीत करून जाई !

नमूला हें समजत नव्हतें, सांगतां येत नव्हतें; पण जाणवत होतें. कापसासारख्या मऊ पांढऱ्या ढगांत बसून वारंवार जावें तसें होई. स्वप्नें पडत आणि तीं भारीं चांगलीं असत, गोड असत, तिच्या झोंपेची माधुरी वाढवीत. (ताईंच्याकडे आल्यापासून दोन तीन वर्षांत असें कांहीं तिला कोणी देत राहिलें आणि ती घेत राहिली कीं ती मोठी दिसूं लागली, तरुणी दिसूं लागली.) तिचें तिलाच वाटूं लागलें, आपण उंच झालों आहोंत; आपण चांगल्यासुद्धां दिसतों आहोंत. वेशभूषा करण्यांत तिचा अधिक वेळ जाऊं लागला. आरशांत पाहात राहणें तिला आवडूं लागलें.

मग तें गळ्यांतलें मंगळसूत्र, म्हाताऱ्या नवऱ्यानें बांधलेलें तें मंगळसूत्र-तिला वाटे कीं तें काढून ठेवावें तिनें तसें केलें नाहीं पण—तें पोलक्याच्या आंत ठेवावें. तेवढें एक सोडलें तर बाकी सगळें चांगलें होतें.

ताईनीं तिला शिवणाच्या क्लासांत घातली होती. कागदाचीं फुलें करायला शिकविलीं होतीं. ती जर भरतकाम शिकली असती तर त्या तिला तेंसुद्धां शिकवायला तयार होत्या.

कागदाचीं फुलें करीत दुपारच्या वेळीं नमू खिडकींत बसली होती. पलीकडच्या खोलींत ताई झोंपल्या होत्या. काका–ताईचे यजमान–वाचीत होते. फुलें करितां करितां नमूनें सहज समोर पाहिलें. नवीन लग्न झालेलें एक जोडपें गॅलरींत उभें होतें. एकमेकांना खेटून उभें होतें. एकमेकांकडे हंसून पाहात ओंठांतल्या ओंठांत कांहीं बोलत होतें. तें बोलणें नमूला ऐकूं येत नव्हतें, ऐकूं येणें शक्य नव्हतें. पण तिला असें वाटलें, कीं जगांत जेवढ्या म्हणून भाषा आहेत त्याहून ही वेगळीच आहे ! तेवढ्यांत त्या माणसानें आपल्या बायकोला चिमटा काढला आणि कृतककोपानें त्याच्याकडे पाहात ती त्याला आणखीनच बिलगून उभी राहिली. नमूला त्या मुलीचा उगीचच राग आला आणि त्या माणसाविषयीं उगीचच सहानुभूति वाटली. कागदाच्या फुलांचें काम रेंगाळूं लागलें आणि ती तशीच त्याच्याकडे पाहात राहिली. तो आपल्या थिल्लर बायकोशीं बोलतो आणि आपल्यालाच चमत्कारिक कां होतें हें तिला कळेना. रागारागानें बसल्या जागीं अंग घुसळल्यासारखें करून तिनें त्यांच्याकडे पाठ फिरविली.

हातांतले कागद ती लक्षपूर्वक कापायचा प्रयत्न करूं लागली, पण त्या कात्रीमधून दोन तीन वर्षांपूर्वींचीं कापलेलीं चित्रें तिला दिसूं लागलीं. लहानपणच्या मैत्रिणींची तिला आठवण येऊन गेली. कागदाचे चार कपटे कांहीं वेळ एकत्र असावेत आणि वाऱ्याच्या झोताबरोबर ते नाना दिशांना उडून जावेत तशा मैत्रिणी. आतां त्या मैत्रीचा कोणत्या तरी कात्रीनें अगदीं तुकडा पाडला होता ! कोण कुठें आहेत ?—

पण आठवणी येत राहतात. मैत्रिणींच्याच नाहीं, शत्रूंच्यासुद्धां ! तिचा तो म्हातारा आणि मारकुटा नवरा. . . .त्याची आठवण तिला नको होती आणि तरी येत होती. त्याची ती अर्धवट वाढलेली दाढी, सदा

घामेजलेलें शरीर आणि येतां जातां तोंडें वेडींवांकडीं करून दाढी खाजविण्याची त्याची गलिच्छ संवय... नमूच्या अंगावर शहारे आले. त्याच्या कळकटपणाची तिला आतांसुद्धां शिसारी आली. आणि असल्या या मूर्ख नवऱ्यानें तिला मारिलें होतें तसा तिचा हातहि धरला होता. तिला जवळहि घेतलें होतें. आणि त्यानें तिचें तोंड....

......नमूनें एकदम मान फिरवून त्या समोरच्या चाळींतील जोडप्याकडे पाहिलें. कांहीं तरी थट्टा करून तीं दोघें आपल्या खोलींत धांवत गेलीं. नमूला हें आवडलें नाहीं. विशेषत: त्या मुलीचें असलें पांचट वागणें तिला मुळींच आवडलें नाहीं. तिला असेंहि वाटलें, कीं ही मुलगी याला बायको म्हणून शोभण्यासारखी नाहीं. त्या मानानें तो....

काका आंत जाऊन स्वयंपाकघरांत पाणी पीत होते. ताई उठून आंत येण्याच्या तयारींत होत्या. चहाची वेळ झाली होती. एरवीं नमू हातांतलें काम तसेंच टाकून चहा करायला उठली असती. पण तिनें आपण फुलें करण्यांत गढून गेल्याचा आव आणला आणि मग ती सावकाश उठली.

आणि तेव्हांपासून ती सारखी ताईंच्याजवळ कागदाच्या सुंदर फुलांसंबंधींच बोलत राहिली. ताईंना कंटाळा आला तरी तिचें संपेचना.

रात्रीं निजली तरी तिला तीं फुलें, ती कात्री आणि त्या कात्रीनें कापलेलीं चित्रें.... त्यांत तिचा नवरा होता. तिच्या परकऱ्या मैत्रिणी होत्या. तें नवें, थिल्लर पांचट जोडपें होतें. आणि सगळ्यांनीं मिळून तिला अस्वस्थ करून सोडिलें होतें. एवढें बरें होतें कीं ,ही अस्वस्थता कोणाला कळली नव्हती. उलट ती फार उत्साही आहे असेंच ताईंना वाटत होतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नमू उठली, आणि सहज तिनें समोर पाहिलें तों तो कालचा तरुण मनुष्य ब्रशानें दांत घाशीत गॅलरीच्या कठड्याला रेलून उभा होता. आणि त्याची बायको नळावरून पाण्याच्या कळशा घरांत नेत होती. आणि जातां येतां त्याच्याकडे पाहात होती. नमूला वाटलें, मुद्दामच तिनें हें काम त्या वेळीं काढलें होतें आणि त्याला कधीं न पाहिल्यासारखें तिचें तें पाहणें नमूला मुळींच आवडलें नाहीं. तिनें तिच्याकडे एकदां तुच्छतेनें पाहिलें; आणि गालाला हात लावून हंतरुणावर बसून ती त्याच्याकडे पाहूं लागली. त्यानेंहि सहज हिच्याकडे पाहिलें आणि नमूला कमालीची लाज वाटली. असें त्यानें पाहावें हें चांगलें का ?

नमू उठलीच. तिनें हंतरूण गोळा केलें. आणि ती नित्याच्या उद्योगाला लागली. आज ताईंना थोडी कसर आली होती. "ताप आला आहे का ग ?" असें काकांनीं ताईंना विचारिलें आणि तिच्या देखतच ताईंच्या गालाला हात लावून पाहिला. नमू आपली बाहेरच्या खोलींत काम करूं लागली.

दुपारीं आतां त्या नव्या जोडप्याकडे पाहावयाचें नाहीं असें तिनें मनाशीं ठरविलें आणि पाठ करून ती खिडकींत कागदाचीं फुलें करीत बसली. कित्ती वेळ तरी तिनें मागें वळून पाहिलें नाहीं. पण मग हळूंच पांच पांच मिनिटांनीं ती पाहूं लागली, आणि तिची निराशा होऊं लागली. तिथें कोणीच नव्हतें. मग तिच्या लक्षांत आलें कीं, काल रविवार होता. आज तो ऑफिसला गेला असला पाहिजे.' नमूचें मन एकाएकीं खट्टू झालें. ती गॅलरी मोकळी आहे हें माहीत असूनहि नमू सारखी त्या दिशेला पाहात राहिली.

कां कोण जाणे, पण त्या दिवशीं नमू बाहेर गेली नाहीं. संध्याकाळीं चांगले दिवे लागून गेल्यानंतर तो आला आणि चांगले कपडे घालून

बायकोचा हात हातांत धरून धडाधडा जिने उतरून फिरायला गेला. त्या चाळींतली इतर मंडळी एकमेकांकडे पाहून हंसली. पण नमूला राग आला. ती त्याची बायकोच थोडी जास्त 'ही' होती. साधें फिरावयाला जायचें तर तिनें फुलांची वेणी केंसांत घातली होती. ती वेणी लगेच दुसऱ्या दिवशीं सुकून गेली असती. आणि नवें पातळ फिरायला जातांना......अशानेंच कपडे लौकर फाटतात.

नमू काम करीत होती, पण लक्ष त्यांत नव्हतें.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं ताई नमूला म्हणाल्या, "नमे, आज त्या दात्यांची सून बाळंतीण झाली आहे दवाखान्यांत. तिला एकदां पाहून येऊं या."

नमूच्या मनांत जावयाचें नव्हतें. तिला खिडकींत बसून कागदाचीं फुलें करावयाचीं होतीं. पण ती तसें कांहीं म्हणाली नाहीं. ताईंच्या-बरोबर दवाखान्यांत गेली. दात्यांची सून आपलें तीन चार दिवसांचें लालचुटुक, मऊमऊ अंगाचें, गुबगुबीत बाळ जवळ घेऊन कॉटवर निजली होती. तिनें डोकीवरून पदर घेतला होता. आणि आई झाल्यामुळें ती कशी निराळीच दिसत होती. तें मूल जेव्हां रडूं लागलें तेव्हां तिनें तें पदराखालीं घेतलें. नमूला एकाएकीं स्वतःचें शरीर कशानें तरी भरून गेल्यासारखें वाटलें. तोंच त्या बाईचा नवरा आला. त्याला बायकोला आणि मुलाला भेटायची कोण घाई झाली होती! ताई आणि नमू तिथें बसल्या होत्या, तरी त्यानें त्या पदराखालच्या मुलाच्या अंगाला हात लावून पाहिला. आणि त्यानें आपल्या बायकोकडे असें पाहिलें कीं जणुं तिथें दुसरें कोणी नव्हतें. नमूला राग आला. त्या माणसापेक्षां विशेषतः त्या बाईचा तिला फार राग आला. तिनें कांहींच निषेध करूं नये म्हणजे काय!

नमू घरीं आली. तिनें आल्याबरोबर आपलीं कागदाचीं फुलें घेतलीं आणि ती खिडकींत जाऊन बसली. समोरच्या चाळीकडे तिनें पाठ केली होती. आणि वरचेवर मान वळवून पाहात होती.

संध्याकाळचीं कांहीं कामें होतीं. पण तिचें तिकडे लक्ष नव्हतें. ताईंनीच दिवा लाविला. शेगडी पेटविली. भात ठेविला, टोमॅटो चिरायला घेतले. अखेर त्या म्हणाल्या, "आतांच काय ग फुलांचं नडलं आहे? पाटपाणी घे."

नमू उठली. पण तिला ताईंचा राग आला. किती केलें तरी ताई आपल्याला सारखें काम सांगतच असतात. एखादे दिवशीं नाहीं जरा केलें म्हणून काय बिघडलें?

रोज मग असेंच होऊं लागलें. नमूला त्या कागदाच्या फुलांचा नाद लागला आणि ताईंना त्याचा राग येऊं लागला. नमूचें कामांत लक्ष नाहीं असें त्या कुरकुरूं लागल्या. नमूच्या मनांत आलें, कीं 'मुलगी, मुलगी' असें कितीहि म्हटलें तरी आपण नोकरच!

तेव्हांपासून नमूला त्यांचा राग येऊं लागला. धसाफसा काम करावें, निष्काळजीपणानें काचपात्र फोडावें आणि असें करीत असतांना एका मनानें आंतल्या आंत कसला तरी गुंजारव करीत असावें असें होत होतें.

तिच्या वागण्यांतला हा फरक ताईंच्या लक्षांत येऊं लागला होता. कागदाच्या फुलांचें निमित्त त्यांना समजूं लागलें होतें. तिचें मन असें भरकटूं नये म्हणून त्या तिला कांहीं ना कांहीं काम सांगत. पण त्यानेंच नमूचा कपाळशूळ उठे! तिला जें घोळत बसायला हवें होतें तें मिळत

नव्हतें. दिवसभर तिचें स्वतःच्या मनाविरुद्ध काम चालें. आणि मग हंतरुणावर पडल्यावर नमूचा जीव असा हलका, एकटा, होऊन जाई. कसल्या तरी दुःखानें तें सारखें हुरहुरत राही.

रात्रीं नमू हंतरुणावर पडली. तिला तें समोरचें जोडपें, ती दवाखान्यांतील बाळंतीण, तिचा तो अधिकारानें मुलाला हात लावणारा नवरा आणि काकांनीं ताईंच्या गालाला केलेला स्पर्श... सारें आलटून पालटून दिसूं लागलें. आज संध्याकाळीं तो समोरच्या चाळींतला तरुण तिच्या शेजारच्या घरीं आला होता. काका घरांत नव्हते म्हणून तो त्यांच्याकडे आला नसेल कदाचित्. त्याच्याशीं बोललें तर, त्याचा चेहरा मोठा सभ्य आणि.... त्या मानानें त्याची बायको....छे! ती थोडी 'ही'च आहे. तो मात्र.... त्याचें नांव–काय बरें त्याचें नांव असेल? कोण असेल तो? काय करीत असेल तो? त्या चाळींत तो नवीनच आला असला तरी अगदीं अलीकडेच आपलें त्याच्याकडे कसें लक्ष गेलें? यापूर्वी कसें नाहीं गेलें? गेलें असतें तर काय झालें असतें? आणि अजूनहि नसतें गेलें तर काय बिघडलें असतें? सहज दिसला म्हणून पाहिले झालें! बाकी तो दिसायला चांगला आहे. त्याचें नांव, आडनांव काय असेल? आपण त्याच्याशीं बोललों तर? आपण बोललों तर? बोललों तर? तर तर?....

झोपेच्या अंधारांत तो प्रश्न खोल खोल जाऊं लागला. आणि पहांटे त्यानें तिला लौकर जागें केलें. पलीकडच्या खोलींत काका आणि ताई झोंपलीं होतीं. बाहेरच्या म्युनिसिपालटीच्या दिव्यांचा अंधुक प्रकाश खिडक्यांतून आंत आला होता आणि खोलींत वेड्यावांकड्या सावल्या ठिकठिकाणीं जमल्या होत्या.... हवेंत किंचित् गारवा होता.. एक उदास, गार हुरहुर जीव अस्वस्थ करीत होती. त्या अर्ध्यामुर्ध्या अंधारांत

कोणतीहि वस्तु अर्धीमुर्धी दिसत होती. आणि कांहीं तरी चोरपावलीं नमूच्या मनांत, शरिरांत प्रवेश करीत होतें. बेडावल्यासारखी, भांबावल्यासारखी नमू उठली आणि हलक्या पावलांनीं खिडकींत येऊन उभी राहिली. समोरच्या गॅलरींत दिवे लागले होते. माणसें नळावरून जात येत होतीं. त्या उथळ मुलीचा नवरा दिसतो कां तें ती पाहूं लागली.

तों थोड्या वेळानें तीं दोघें एकदमच खोलीच्या बाहेर आलीं. त्यांच्या हातांत सामान होतें. त्यानें एक बॅग घेतली होती, होल्डॉल घेतला होता आणि तिच्या हातांत फराळाचा डबा आणि पाण्याचा तांब्या होता. म्हणजे तीं दोघें बाहेरगांवीं चाललीं होतीं तर ! नमूला राग आला. तिनें पुढें आलेलें कपाळ वर चढविलें आणि खोल असलेले डोळे आणखीच बारीक करून घेतले. खालीं व्हिक्टोरिया आलेली होती. आणि आतां हळूंहळूं दिसूं लागलें होतें. आकाश निळें आहे. झाडें हिरवीं आहेत, घरें रंगीत आहेत हें कळूं लागलें होतें. त्या निळ्या आकाशाच्या निळसर पांढुरक्या प्रकाशांत तीं दोघे रथासारखीं त्या घोडागाडींत बसलीं आणि राजाराणीसारखीं कुठें तरी निघून गेलीं.

नमूचा जीव कालवला. डोळे भरून आले आणि तिनें आपलें पाऊल खिडकींतून मागें घेतलें. स्वयंपाकघरांत जाण्यासाठीं ती वळली तों ताई तिच्यामागेंच होत्या. त्या एवढेंच म्हणल्या, " काय पाहात होतीस ? आज लौकर उठलीस वाटतं ? "

नमूला राग आला. आपण केव्हां उठावें याच्याशीं ताईंना काय करावयाचें होतें !

ती पुन्हा हंतरुणावर जाऊन पडली. ताईंनींच शेगडी पेटविली. चहा केला. बंबांत विस्तव घातला. बाहेर एव्हांना फटफटीत उजाडलें

होतें. पण नमू तशीच निजून राहिली होती. ती कशानें तरी आंतून धुमसत होती. ताईंनीं हांक मारल्यावर ती उठली. जातां जातां तिनें समोर पाहून घेतलें. अजून तो तरुण परत आला नव्हता. बहुधा तोहि तिच्याबरोबर गांवाला गेला होता. नमू अस्वस्थ होत होती. चहा पिऊन ती भाजी आणायला गेली ती दोन तासांनीं परत आली. ताई रागावल्या. मग ती स्नानाला गेली. अर्धा तास तिनें न्हाणीघराचें दार अुघडलें नाहीं. ताईंनीं तिला हांक मारिली तेव्हां ती बाहेर आली. बंबांतलें सगळें पाणी खलास झालें होतें. ताई पुन्हां एवढेंच म्हणाल्या, " हें काय, बंबांतलं सगळं पाणी संपलं ? "

उत्तर न देतांच नमू पोक काढून तरातरा तिथून निघून गेली.

जेवायला बसली तेव्हां तिला घेरी आल्यासारखें होऊं लागलें. डोळे तांबूस झाले. अंग कसकसूं लागलें. हातपाय आपटून कोणावर तरी सपाटून रागवावें असें तिला वाटूं लागलें. राग आला, दुःख झालें, रडावेंसें वाटलें आणि ओरडावेंसेंहि वाटलें. ताईंनीं मृदु स्वरांत विचारिलें, " नमू, काय होतंय तुला ? हात धरून पानावर काय बसली आहेस ? जेव, खा. "

नमूला भरून आलें. लगेच रागहि आला. " नको आहे मला! " असें म्हणून ती उठली, हंतरूण घालून निजून राहिली.

सगळें आटोपून ताई दुपारच्या जरा पडायला निघाल्या. तेव्हां त्यांनीं तिच्या अंगाला हात लावून पाहिला. ताप नव्हता. त्या अनाथ कुरूप मुलीची त्यांना दया आली. त्यांना वाटलें तिला झोंप लागली आहे.

पण नमूला झोंप लागली नव्हती. तिला वाटत होतें ताई आपल्यावर पहारा करतात. ह्या काय आपलें चांगलें करणार? ह्या फक्त कामें

करून घेणार! तिला आपल्या लहाणपणच्या मैत्रिणींची आठवण झाली. मारकुटचा, म्हाताऱ्या नवऱ्याची आठवण नको होती तरी येत होती. त्यानें मारलें होतें तसेंच तिचे हात धरले होते. त्या समोरच्या तरुणानें आपल्या बायकोचे हात....पण तें वेगळें. हें वेगळें, तिला आठवण झाली, त्या तरुण माणसाच्या हातांची ठेवण आणि आपल्या काशी भटच्या हातांची ठेवण सारखी होती. ती आपल्याला चिमटे काढायची. खांद्यावरून हात टाकायची तिला संवय होती. नमूच्या अंगावर रोमांच आले. काशीला आपण भेटलें पाहिजे. तिला सांगितलें पाहिजे. तिच्या गळ्यांत पडून एकदां पोटभर रडलें पाहिजे. ती इथेंच कुठें तरी मुंबईंत राहते. तिला भेटलें पाहिजे. विचारिलें पाहिजे कीं मला काय असें होत आहे?

–पण काशीचा पत्ता तिला माहीत नव्हता. तरी तिला चैन पडेना. स्वस्थ बसवेना. कांहीं करावेंसें वाटेना. वेलीच्या फांदीला नवे धुमारे फुटावेत आणि वेदना व्हाव्यात तसें तिला होत होतें. ती उठली. ताई झोंपल्या होत्या. काका घरांत नव्हते. हळूंच चपला घालून ती घराबाहेर पडली.

नमू रस्त्यावरून चालूं लागली. कुठून कसें जावयाचें याचा हिशेब तिच्याजवळ नव्हता. ती चालत होती. तिचे डोळे काशीला शोधीत होते. अडखळत्या चालीनें, शोधक नजरेनें आणि अस्थिर मनानें ती काशीचा शोध घेत होती. प्रथम तिला काशी कुठेंच दिसेना; आणि मग सगळीकडे काशीच दिसूं लागली! दुपारीं तीन वाजल्यापासून नमू केव्हांची चालत होती. संध्याकाळ व्हायला आली तरी रस्ता संपत नव्हता, काशी भेटत नव्हती आणि नमू थांबत नव्हती. पत्ता माहीत नसतांना काशीची एवढी विलक्षण ओढ आपल्याला कां लागली आहे हें तिचें तिलाच समजेना. तें समोरचें जोडपें आणि काशी यांचा बादरायण संबंध आपण कां जोडतों तें

तिला कळेना. काशी कांहीं विशेष मुलगी नव्हती. नमूसारखीच, फक्त तिच्या सुखदु:खांत लहानपणीं सहभागी होणारी. मोठेपणीं कांहींच नाहीं. पण तिचे हात, जिवणीची ठेवण, खांद्यावरून हात टाकण्याची तिची संवय...... नमूला वाटलें कीं शोधावें. कांहीं तरी हरविलें आहे तें शोधून काढावें. काशीच ! काशीच हरविली आहे. तिला चांगली मोठ्यानें हांक मारावी "काशी ! "

पण तिलाच कोणीं तरी हांक मारिली, "नमू, अग तूं इकडे कुणीकडे?"

"आँ ? तुम्ही कशा इथें, काकू ? " नमूनें आश्चर्यानें विचारिलें. काकू तिच्या गांवच्या होत्या. ती म्हणाली, "मी इथेंच असतें. पण काय हो, काशी कुठें असते हल्लीं ? "

"कोण काशी ? "

"आपली काशी भट. तिला मला भेटायचं आहे. "

"मला नाहीं बाई माहीत. पण तूं बरी आहेस ना ? दिसते आहेस चांगली. भरली आहेस अंगानं." तिच्या गळ्याकडे पाहात काकूंनीं विचारिलें, "मूल–बाळ.... "

"तें कांहीं विचारूं नका, काकू " असें एकदम म्हणून नमू चालूं लागली. एक सैरभैर वेदना तिच्या अंगांतून निघून गेली. आणि नमू पुन्हा पुढें चालूं लागली. काशीचा शोध ! काशी !–

पण या अफाट मुंबईंत काशीचा शोध कसा लागणार ? दिवे लागूं लागले तशी नमूचें चित्त थरथरलें. कपाळावरून घामाच्या धारा लागल्या

होत्या. डोळे ओढल्यासारखे झाले होते आणि हंतरुणावर पडून डोळे मिटावेत असें वाटूं लागलें होतें.

पण ताईंचा चेहरा समोर येऊं लागला. कामासाठींच आपल्याला या बाईनें ठेवून घेतलें आणि आज सबंध दिवस....ताई आपल्याला बोलतील, मारतीलसुद्धां ! त्यांना आपण काय सांगायचें ? पण खरें सांगायचें, खोटें बोलायचें नाहीं. पण खरें तरी काय सांगायचें आणि खोटें तरी काय सांगायचें ?

नमू चोरटचा, दबकत्या पावलानें दारापाशीं आली. ताई तिची वाटच बघत होत्या. नमू नाहींशी झाल्यामुळें त्यांचा रक्तदाब वाढला होता. त्यांच्या उशाशीं पंखा ठेविला होता आणि काका औषध ओतून देत होते. काका रागावलेले होते आणि नमू भेदरून गेली होती. ती आंत जाऊं लागली तशी काका म्हणाले, "कुठें गेली होतीस ? न सांगतां गेलीस ! तुझ्या काळजीनं हिचा आजार वाढला. म्हणजे हिच्यासाठीं आम्ही तुला.... "

ताई काकांना थांबवून म्हणाल्या, "ऐकलंत का, मी सांगेन तिला काय तें. तुम्ही जरा बाहेर जाऊन या. माझं जरा बरं आहे आतां.... नमू, जा. पाय धुऊन ये. देवापाशीं दिवा लाव आणि चुलीवर भात टाकून इकडे ये."

नमूच्या घशांत हुंदके दाटूं लागले. ताईंनीं सांगितलेलें काम तिनें कसेंबसें केलें आणि ती परत त्यांच्याजवळ येऊन चोरट्या अंगानें उभी राहिली.

ताईंनीं तिला म्हटलें, "बैस, इथें बैस माझ्याजवळ."

नमूला वाटलें, ताई आपल्याला आतां विचारतील. पण त्यांनीं कांहीं विचारिलें नाहीं. त्या नुसत्या तिच्या पाठीवरून हात फिरवूं लागल्या. नमूला जास्तच भरून येऊं लागलें. आपण चुकलों, आपण चुकलों, असें तिला फार वाटूं लागलें. सरकत सरकत ती ताईच्या पायांकडे गेली आणि त्यांचे पाय चेपूं लागली. पण–

ताईंनीं तिला जवळ बोलाविलें. म्हणाल्या,

"नुसती बैस. मला बरं वाटतंय."

इतका वेळ आवरलेला हुंदला नमूला आतां आवरला नाहीं. त्यांच्या कुशींत शिरून ती हमसाहमशी रडूं लागली, तशी तिला थोपटीत ताई म्हणाल्या, "मला समजतंय. मला कळतंय, नमू. रडूं नकोस, रडूं नकोस. मी आहें तंवर तुझं कांहीं तरी भलं करून देईन."

---

५. .... नावेंतील पाणी

बाबीकाका ज्योतिष्याच्या घरांतून बाहर पडले आणि रस्त्यावर आल्यावर त्यांनीं आपला सुरकुतून गेलेला हात पुन्हा पुन्हा पाहिला. गेलें सबंध वर्षभर बाबीकाकांना हा नवाच नाद लागला होता. आतांपर्यन्त दहावीस ज्योतिष्यांना तरी विचारून झालें असेल, ' माझें आयुष्य किती आहे? ' सदुसष्ट वर्षें जगलेल्या माणसानें, लांकडाच्या मोळीसारखा देह झालेल्या माणसानें, आपला हात पुढें करून आशाळभूतपणानें आयुष्यमान विचारिलें, कीं प्रत्येक धंदेवाईक ज्योतिषीसुद्धां आश्चर्यानें भुंवया वर करी. तरी पण कोणीं सांगावें, ' सत्तर वर्षें; ' कोणी म्हणावें, 'बहात्तर वर्षें.' पण बाबीकाकांचें समाधान होत नसे. हताश मुद्रेनें ते विचारीत, 'एवढेंच ?' ज्योतिषी मनांतल्या मनांत म्हणे, ' काय हा जगण्याचा सोस ! कोण हा जगण्याचा हव्यास! ' त्यांनाच काय, पण बाबीकाकांच्या घरांतील सर्व माणसांना त्यांचें हें ज्योतिषाचें वेड पाहून असेंच वाटत असे. या गोष्टीला अपवाद होता फक्त थोरला मुलगा ! बाकी त्यांचा धाकटा मुलगा, दोन्ही सुना, सगळ्यांत मोठा नातू या सर्वांना असेंच वाटत होतें कीं बाबीकाकांना जगण्याचा भारी हव्यास आहे. एवढा संसार झाला. बायको केव्हांच मरून गेलेली. हातून कांहीं होत नाहीं. पासष्ट वर्षांपासून ते पंचात्तर वर्षांचे दिसत आहेत. अगदीं

चाळिसाव्या वर्षापासून म्हातारे होत चाललेल्या या बाबीकाकांना हा जगण्याचा सोस कोणासाठीं ? पण बाबीकाका नित्य नवा ज्योतिषी शोधून काढीत आणि त्याला आपला हात दाखवीत, पत्रिका दाखवीत. पण मनासारखा ज्योतिषी अजून त्यांना भेटला नव्हता. सत्तर आणि बहात्तर वर्षेंच आयुर्मान सांगणाऱ्या ज्योतिष्यांवर त्यांचा विश्वास बसत नव्हता. पण तरीहि आतां फक्त दोनच वर्षें शिल्लक आहेत हें ध्यानांत आलें कीं त्यांना बावरल्यासारखें होई. त्यांच्या मनांत येई कीं आपल्या जीवनाचा फुगा आतां आवळत चालला आहे. त्यांतली हवा संपत आली आहे. बाबीकाकांना एकाएकी अधांतरीं लोंबकाळल्यासारखें वाटूं लागे. कशाला तरी आपण लोंबकाळून आहोंत, कधीं हात सुटेल आणि आपण...... इतके दिवस नाव पाण्यावर होती, आतां नावेंत पाणी शिरूं लागलें कीं काय या शंकेनें ते कासावीस होत. थोडें कांहीं दुखूंखुपूं लागलें कीं आणखी घाबरे होत. पण बाबीकाकांना अजून पोहोण्याची इच्छा होती. किंबहुना पोहण्याची मर्यादा संपते आहे असें दिसतांच त्यांना जोरानें हात मारावेसें वाटूं लागे. म्हणूनच त्यांना ऐंशीं वर्षें आयुष्य सांगणारा ज्योतिषी हवा होता. आणि तो त्यांना आज भेटला होता. आजच्या ज्योतिष्यानें त्यांना ऐंशीं वर्षें आयुष्य सांगितलें होतें. आपली लांबलचक आयुष्यरेषा निरखून पाहात बाबीकाका म्हणूनच थोडे हरखून चालले होते.

ते घरीं आले. नेहमींप्रमाणें येतां येतां त्यांनीं दाराबाहेर असलेली पत्रांची पेटी उघडून पाहिली. त्यांचें पत्र त्यांत कधींच नसे; त्यांना पत्रें पाठविणारीं माणसें त्यांच्या जवळच होतीं. पण तरी त्यांना तो नाद होता. पेटींत दोन पत्रें होतीं. तीं त्यांनीं काढून घेतलीं आणि घरांत येऊन ते खिडकीपाशीं उभे राहिले. आपल्या खिशांतील चांदीच्या फ्रेमची आरशी त्यांनीं काढली. तिच्या काड्या आधींच केव्हां तरी मोडलेल्या होत्या, म्हणून त्यांनीं तेथें दोरे

बांधलेले होते. दोरे कानांना गुंडाळून नाकावर दोन कांचा बसवीत त्यांनीं तीं पत्रें वाचायला घेतलीं. एकदां इकडे तिकडे पाहिलें. आपण दुसऱ्याचीं पत्रें वाचतों हें कोणी पाहूं नये अशी दक्षता ते घेत होते. पण तेवढ्यांत त्यांचा धाकटा मुलगा तेथें आला. त्यानें तीं पत्रें मागितलीं आणि नाइलाजानें त्यांना तीं द्यावीं लागलीं. तीं देतां देतां त्यांनीं चेहरा तऱ्हेवाईक केला. मुलाचा चेहरा तरारल्यासारखा झाला होता. कांहीं तरी टाकून बोलण्याचें त्याच्या मनांत आलें होतें; पण त्यानें तें गिळलें. तरी तो गुरगुरला, " तुमचीं पत्रं नाहींत तीं. एक अप्पांचं आणि दुसरं माझ्या बायकोचं आहे. "

असें म्हणून बायकोचें पत्र घेऊन तो तरातरा स्वयंपाकघराकडे गेला. बाबीकाकांनीं ओठांतल्या ओठांत मुलाला एक शिवी दिली आणि ते पुटपुटले, 'माझी बायको', ' माझी बायको ' असं माझ्यासमोर म्हणायला याला शरम नाहीं वाटत ?

आणि इकडे ती सूनबाई आपल्या नवऱ्याच्या कानाशीं लागून पण बाहेर मामंजींना ऐकूं जाईल एवढ्यानें बोलत होती, " यांना काय करायचीं आहेत आमचीं पत्रं वाचून? म्हातारपणीं हें शोभतं का यांना? आमचे बाबा नाहींत का म्हातारे ? पण यांची एकेक संवयच मुलखावेगळी ! ज्यांत त्यांत तोंड घालतील. "

हें सगळें बाबीकाकांना ऐकूं येत होतें पण पत्रांच्या पेटींत हात घालणें, दुसऱ्याचीं पत्रें चोरून वाचणें, आणि तें उघडकीस आलें कीं कोणाचें तरी असलें बोलणें हलक्या कानांनीं ऐकून घेणें त्यांच्या अंगवळणीं पडून गेलें होतें. ते चरफडत, तडफडत, आणि तरी दुसऱ्या दिवशीं डाकेच्या वेळीं अचूक पत्रांच्या पेटीपाशीं जात. पत्रांतून आपल्याबद्दल कोणीं कांहीं लिहिलें आहे कीं काय, हें त्यांना पाहायचें असे.

बाबीकाकांनीं अंगांतला कोट काढला. लोंबकाळल्यासारखा तो खुंटीला अडकविला. तो नीट करण्याची शक्ति त्यांना नव्हती. त्या कोटाचा मालक जसा आयुष्याला लोंबकाळून होता तसाच त्याचा कोटहि खुंटीला......

बाबीकाका जुन्या सतरंजीवर तक्क्याला टेकून बसले. तेवढचांत त्यांच्या एका नातीनें चहाचा कप त्यांच्यासमोर आणून ठेविला. ८॥–९ च्या सुमारास बाबीकाकांचा चहाचा दुसरा हप्ता असे. पण पत्राच्या त्या प्रकारामुळें ते आज चिडले होते. त्यांनीं तो कप उचलला आणि स्वयंपाकघरांत नेऊन ठेविला. मोठ्या सूनबाईनीं विचारिलें, " कां ? काय झालं?"

" मला नको आहे चहा."

आणि बाबीकाका पुन्हा बाहेर येऊन बसले. थोडा वेळ त्यांनीं वर्तमानपत्र चाळिलें. वर्तमानपत्र वाचायला घेतलें कीं जाहिरातींसकट अक्षरन् अक्षर वाचायचें असा त्यांचा शिरस्ता होता. पण आतां त्यांचें मन जाग्यावर नव्हतें. ते उठले आणि गॅलरींत येऊन उभे राहिले. नळावर जातां जातां कोणीं तरी बाबीकाकांना विचारिलें, " काय बाबीकाका बरं आहे ना?"

पण बाबीकाका फणकारून म्हणाले, " बरा असल्याशिवाय का इथें उभा आहें मी ?" त्यांनीं गळ्याजवळच्या वर आलेल्या हाडावरून हात फिरविला आणि आजूबाजूला तिरसटपणानें पाहात पाहात ते पुन्हा आंत आले. नऊ वाजतांचा चहा झाल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. पण आज त्यांनीं तो घेतला नव्हता. आतां मागायचा म्हणजे आपला कमीपणा. मग ते स्वयंपाकघराच्या उंबऱ्याशीं येऊन उभे राहिले आणि जणुं भिंतीशीं बोलल्याप्रमाणें त्यांनीं म्हटलें, " मला भूक लागली आहे."

सूनबाईनीं बेसनाचा लाडू आणि चिवडा बशींत घालून त्यांच्यापुढें ठेविला. बसायला पाट मांडिला. प्यायला पाणी दिलें. पण बाबीकाका बशी घेऊन

बाहेर आले. तक्क्याशीं बसले. चिवड्याचे चार चार दाणे ते तोंडांत टाकीत होते. इकडे तिकडे पाहात होते. कांहीं शोधीत होते. तोंच त्यांची पांचसहा वर्षांची नात धांवत धांवत आली. ' आजोबा, आजोबा ' करीत त्यांच्या गळ्यांत पडली. ' अग हो, अग हो —' करीत त्यांनीं तिला जवळ घेतलें; तिचा पापा घेतला. तिच्या झिपऱ्या सावरल्या. आणि ' कुंकू कां नाहीं लावलंस? ' म्हणून ते तिला चांगले रागें भरले. आणि मग त्यांनीं चिवड्याचे दाणे तिच्या हातावर ठेविले. आणि हलक्या आवाजांत ते तिला म्हणाले, " मला एक कागद दे पाहूं आणून. "

नातीनें कागद आणून दिला. बाबीकाकांनीं बशींतला निम्मा लाडू नि चिवडा त्या कागदांत बांधिला आणि पुडी कोटाच्या खिशांत ठेवून दिली. धाकट्या सूनबाईनें हें मधल्या दाराच्या आड उभें राहून पाहून घेतलें, आणि थोरल्या जाऊबाईंना सांगितलें. तिनें मान उडविली आणि स्वयं-पाकाच्या गडबडींत जास्त वेळ नव्हता म्हणून ती म्हणाली, " म्हातारचळ लागला आहे त्यांना! तूं काय तिकडे लक्ष देतेस? खायला मागितलं कीं खायला द्यायचं काम आपलं. "

बाबीकाकांचा धाकटा मुलगा आणि नातवंडें दहा वाजतांच जेवून उठलीं. मुलाला कचेरी होती. नातवंडांना शाळा होती. अकराच्या सुमारास सूनबाईनीं मामंजींना विचारिलें, 'पान वाढायचं ना?'

बाबीकाका फुरंगटल्यासारखे म्हणाले, " आतांच तर खाल्लं, लगेच कशी भूक लागेल? मला नाहीं जेवायचं. "

सूनबाई आंत गेली. बाबीकाकांची ऊठबस चालली होती. घरांत कोणी फारसें नव्हतें. मोठ्या मुलाचें स्टेशनरी मालाचें दुकान होतें. तो जेवायला

थोडा उशीरां येत असे. धाकटा मुलगा कचेरींत, मुलें शाळेंत, आणि सुना स्वयंपाकघरांत. धाकट्या दोन नातवंडांची गडबडहि मंदावली होती. दुपारच्या वेळीं थोडें शांत होत चाललें होतें.

थोडा वेळ गेल्यानंतर मोठ्या सूनबाई मामंजींना पुन्हा एकदां विचारावें म्हणून बाहेर येऊं लागल्या. पाहतात तों मधला दरवाजा ओढून घेतलेला. तिनें जरा कान देऊन पाहिलें तों कसला तरी आवाज येत होता. दार किलकिलें करून ती पाहूं लागली. असें पाहणें चांगलें नव्हे, हें तिला समजत होतें. पण बाबीकाकांचे एकेक उपद्व्याप असे पाहून घेण्यासारखेच असतात हेंहि तिला माहीत झालें होतें. बाबीकाका टेबलाच्या खणाला किल्ली लावून पाहात होते. तिच्या अंगाचा अगदीं संताप झाला. पुढें येऊन म्हाताऱ्याला ती कांहीं ऐकविणार होती. पण तिला नवऱ्याची आठवण झाली. आपल्या बापाला बोललेलें अप्पांना खपलें नसतें, हें तिला माहीत होतें. म्हणून ती दाराआड लपून नुसतें पाहात राहिली.

•

बाबीकाकांनीं किल्ली लावून खण उघडिला आणि पाकिटांतील दहाची नोट थरथरत्या हातांनीं काढून घेतली. इकडे तिकडे पाहात त्यांनीं ती लोंबकाळणाऱ्या कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवून दिली. किल्ल्या पुन्हा खिळ्याला लाविल्या आणि साळसूदपणें दरवाजा उघडून ते पुन्हा तक्क्याशीं येऊन बसले. पण त्यांना मोकळें वाटत नव्हतें. उबल्यासारखें, धास्तावल्यासारखें होत होतें; आणि वाटत होतें कीं आपल्यावर कोणाचा तरी सारखा पहारा आहे. आपल्याच मुलाचे पैसे; पण त्याच्या बायकोचा मात्र आपल्यावर पहारा. आपला अधिकार नाहीं त्याच्या पैशावर. मुलगा बिचारा चांगला आहे. पण त्याची ती बायको! ......

आणि दोघी सुना आंत हातवारे करून बोलत होत्या. सगळें सांगून झाल्यावर मोठी सूनबाई म्हणाली, " हे किल्ल्या विसरतात कशा अशा ? किल्ल्या विसरल्या कीं गेलेच पेसे! —"

धाकटी सूनबाई म्हणाली, "माणूस आहे, विसरतं एखादे वेळीं. पण मामंजींनीं कां लगेच हात लावावा ? आतां किल्ल्यासुद्धां कां कुलुपांत ठेवायच्या ? सापासारखे घरभर फिरत असतात. पहारा करीत असतात. आणि तरी मामंजींच्या विरुद्ध घरांत एक शब्द बोलायची सोय नाहीं. "

" तर काय ! चोऱ्या यांनीं करायच्या आणि दिवसभर आम्हांला आपलं चोरट्यासारखं ! जगून तरी या असल्या चोऱ्याच करायच्या ना ? काय जगण्याचा सोस तरी ! पैशांचा हव्यास तरी ! तरी बरं, दोन्ही मुलगे महिन्याच्या महिना हातावर ठेविताहेत. "

त्यांचें असें बोलणें चाललें आहे तों मोठा मुलगा दुकानांतून घरीं आला. भुकेनें कांसावीस होऊन बाबीकाका कण्हल्यासारखें करीत तक्क्याला टेकून बसले होते. अप्पा जवळ गेले आणि त्यांचा हात हातांत घेऊन म्हणाले, " काय होतंय काका ?"

बाबीकाका कांहींच बोलले नाहींत. मुलाच्या त्या प्रेमळ स्पर्शानें त्यांना आणखीच कण्हावेसें वाटलें. अप्पांनीं विचारिलें, " जेवण झालं तुमचं ?"

अप्पानें असें कांहीं जिवाभावानें विचारिलें कीं बाबीकाका आंतून गहिंवरून जात. ओल्या आवाजानें ते म्हणाले, " नाहीं. मला नाहीं जेवायचं. आज तूं जेव जा."

"कां?" कपडे काढतां काढतां मुलानें विचारिलें, "बरं नाहीं तुम्हांला काका ? "

" बरा आहें मी. मला काय झालंय् ? पण मला भूकच नाहीं."

पण अप्पांना माहीत झालें होतें. 'जेवायला चला ' म्हटलें कीं आधीं हे भूक नाहीं म्हणायचे. अप्पा कांहीं बोलले नाहींत. ते हातपाय धुवून आले आणि बाबीकाकांच्या हाताला धरून म्हणाले, " चला काका. माझ्याबरो-बर चला. दोन घांस खा. " बायकोला हांक मारीत ते म्हणाले, " भात गरम आहे का ? पोळीशीं दूध दे त्यांना. " आणि त्यांनीं बाबीकाकांना आपल्या शेजारीं बसविलें. अप्पांच्यासमोर ते आणखीच दुबळे झाले. अशक्त झाले. लहान होऊन गेले. आपल्या मुलाचें ते मूल होऊन गेले. भरून येऊन त्यांची हनुवटी उगीचच लुगुलुगु हालली. आणि निस्तेज होत चाललेले डोळे पाण्यानें भरून आले. मुलाच्या जवळ जेवायला बसले कीं निःशक्त होऊन आपला सगळा भार त्याच्यावर टाकावा असें त्यांना वाटे. अप्पांचें ते नक-ळत ऐकत. अप्पा त्यांना एका शब्दानें दुखवीत नसत. अप्पांच्या वागण्यांत आर्जव होतें. आपले वडील म्हातारे झाले असल्याची जाणीव पदोपदीं, शब्दो-शब्दीं ध्वनित होत होती. त्यामुळें अप्पांचें आणि बाबीकाकाचें चांगलें जमे.

पण त्यांच्या सूनबाईंना आणि इतर माणसांना बाबीकाकांचें हें ढोंग वाटे. अप्पांनीं जेव्हां त्यांना हाताला धरून पानावर आणून बसविलें तेव्हां त्या दोघींनीं एकमेकींना खुणाविलें. कशाच्या तरी निमित्तानें धाकट्या सुनेनें मोठ्या सुनेच्या कानाशीं लागून म्हटलें, " रोजच्या जेवणाला आग्रह हवा असतो यांना."

मोठीनें साथ दिली, "मुलाला बघितल्यावर जीव जातोय का राहातोय असं करतात. आणि मघांशीं किल्ली कुलुपाला लावीत असतांना कुठून शक्ती आली होती? "

त्यांची कुजबुज चाललेली पाहून अप्पांनीं चेहरा ताठ केला. डोळे मोठे करून बायकोकडे पाहिलें. तसें चटकन् दूर होऊन तिनें मामंजींच्या वाटींत आणखी दूध वाढिलें.

पण आज अप्पांच्या बायकोनें ठरविलें होतें. कांहीं झालें तरी नवऱ्याला सांगायचेंच. आजपर्यंत चारदोन आण्यांच्या चोऱ्या पुष्कळ झाल्या. पण कुलुपें फोडून जर दहादहाच्या नोटा जायला लागल्या तर संसार व्हायचा कसा! मामंजी काय आज आहेत आणि उद्यां नाहींत. पण आम्हांला अजून जगायचं आहे म्हणावं......

पण दुपारचीं जेवणें झाल्यावर अप्पा बायकोशीं इतर कांहीं बोलून बाहेरच्या खोलींत निजायला गेलें. त्यांनीं प्रथम बाबीकाकांना अंथरूण घालून दिलें. पडल्या पडल्या त्यांना कांहीं वाचून दाखविलें. आणि दुकानाची वेळ झाल्यावर चहाचा कप तोंडाला लाविला. आपल्याबरोबर बाबीकाकांनाहि चहा द्यायला ते विसरिले नाहींत. बाबीकाकांच्या शक्य तेवढ्या गोष्टी आपल्या समक्ष करून घेण्याचें त्याचें धोरण असे. जातां जातां त्यांनीं बाबीकाकांना सांगितलें, "काका, मी जातों हो."

दर वेळीं जातांना बाबीकाकांना सांगून जाण्याचा अप्पांचा शिरस्ता होता. याच्या उलट त्यांच्या धाकट्या भावाचें धोरण होतें. तो आपल्या बायकोला सांगून जात असे. यांत विशेष काय होतें? पण बाबीकाकांच्या मतें याला महत्त्व होतें. अप्पांचा ओढा त्यांना समजून येई, आणि धाकट्या मुलाचें दुर्लक्ष त्यांना बोचकारे काढी.

अप्पा बाहेर पडतात न पडतात तोंच बाबीकाका बाहेर जायची तयारी करूं लागले. ते अंगांत कोट चढवूं लागले. धोतर सारखें करूं

लागले. कोटाचे खिसे चांचपून आहे–नाहीं पाहूं लागले, आणि जिन्याची एकेक पायरी उतरूं लागले. जातां जातां त्यांनीं थोरल्या सुनेला सांगितलें, "जाऊन येतो ग."

धाकटी सूनबाई म्हणाली, "उन्हाचं बाहेर जायचं काय नडलं आहे यांचं?"

तीहि उठली. गॅलरींत येऊन उभी राहिली. मामंजी कुठें जातात याचा शोध घेऊं लागली. इकडे तिकडे पाहात बाबीकाका कोपऱ्यावर वळले आणि दिसेनासे झाले. सूनबाईला शंका आली. त्यांची चालण्याची तऱ्हा तिला निराळी वाटली. स्वतःला जपणारा, सावरणारा माणूस जसा चालेल तशी चाल, तशी अस्थिर नजर... तिनें बांधलेला पदर खांद्यावरून ओढून घेतला, पायांत चपला घातल्या आणि दोन मिनिटांत ती त्या कोपऱ्यावरच्या वळणावर येऊन उभी राहिली. मामंजींना ज्या ठिकाणीं पाहिलें तें पाहातां पाहतां ती थक्क झाली. बाबीकाका कोपऱ्यावरच्या इराण्याच्या हॉटेलांत उभे होते. कसले तरी पुडे बांधून घेत होते. आणि बिल देण्यासाठीं त्यांनीं पैशाचें पाकिट काढलें होतें. सूनबाई जास्त वेळ रस्त्यांत थांबली नाहीं. तिनें घरीं येऊन मोठ्या जाऊबाईंना रिपोर्ट केला.

मामंजींच्या असल्या व्रात्यपणानें त्या दोघींचें डोकें भंडावून गेलें होतें. कपाळाला हात लावून थोरल्या सूनबाई म्हणाल्या, "म्हातारचळ म्हणतात तो हा! कसं यांना जपायचं? घरांत काय खायला देत नाहीं आम्ही? लोकांना जर हें समजलं तर लोक काय म्हणतील? पण यांना अबरचबर, भजीं–चिवडा खायला हवा असतो. उगीच नाहीं खोकला होत तो! जन्मभर म्हातारा खातो आहे, तरी खाण्याचा हव्यास आणि जगण्याचा सोस कांहीं संपत नाहीं!"

संध्याकाळीं चांगली दिवेलागणी झाल्यावर बाबीकाका घरीं आले. त्या दिवशीं गुरुवार होता. दर गुरुवारीं त्या घरांत दत्ताच्या तसबिरीला हार घालीत आणि उदबत्ती लावून पेढ्यांचा नैवेद्य दाखवीत. एव्हांना मुलें आणि बाबीकाकांचा धाकटा मुलगा घरीं आलेला होता. त्यानें सर्वांना पेढे वांटले. धाकट्या सूनबाई नवऱ्याला म्हणाल्या, "मामंजींच्या हातावर दोन पेढे ठेवा. एक आत्तां खायला आणि दुसरा पुडी करून खिशांत ठेवायला."

तो हंसला. त्यानें दोन पेढे बापाच्या हातावर ठेविले. आणि उरलेल्या पेढ्यांची पुडी करून दत्ताच्या तसबिरीमागें ठेवून दिली.

बायकोशीं बोलतां बोलतां त्याला कसल्या तरी कामाची आठवण झाली आणि तो बाहेर निघून गेला. आणि थोड्याच वेळांत त्याचा एक मित्र राजाभाऊ आला. तो बाबीकाकांच्या स्नेह्याचाच मुलगा होता. बाबीकाकांनीं त्याला 'या बसा' केलें, आणि त्याच्याशीं बोलतां बोलतां हलक्या आवाजांत ते त्याला म्हणाले, "काय रे, तुला एक विचारूं का?"

"काय?"

"कुणाला सांगायचा नाहींस ना?"

"नाहीं."

"मला एक पन्नास रुपये उसने देतोस?"

तो एकदम चकितच झाला. आपले खिसे अगदीं रिकामे आहेत असें दाखवीत, चेहरा पाडून तो म्हणाला, "पन्नास रुपये कुठून देऊं बाबीकाका?"

"बरं, मग थोडेसे दे.–तुझ्याजवळ असतील त्याप्रमाणें...." बाबीकाकांनीं आपला चेहरा त्याच्यापेक्षां दीन केला. राजाभाऊनें पांचाची नोट काढून दिली. बाबीकाकांनीं ती लोंबकाळणाऱ्या कोटाच्या खिशांत ठेविली आणि पुन्हां खालीं बसत ते म्हणाले, "पुढल्या वर्षी परत देईन मी. पण कुणाला सांगू नकोस बरं. माझी शपथ आहे तुला.

कोणालाहि न सांगतां तो माणूस तेथून उठून गेला. पण थोरल्या नातवानें सारें ऐकलें आणि आईला जाऊन सांगितलें. तिनें धाकट्या जावेला टेलिफोन केला आणि बाबीकाकांचें गुपित सगळ्या घरभर गुप्तपणें चर्चिलें जाऊं लागलें.

तेवढ्यांत बाहेर गेलेला धाकटा मुलगा परत आला. बाबीकाकांनीं त्याला सांगितलें, "ऐकलंस का रे, तुझ्याकडे तुझा मित्र येऊन गेला."

"कोण आलं होतं?"

"तुझा तो हा–राजाभाऊ आला होता."

'मग गेला कसा तो?"

"मला रे काय माहीत?"

"म्हणजे काय ? त्याला तुम्हीं सांगितलं नाहींत बसा म्हणून?" मुलगा बापाशीं जणु बाप समजून वागतच नव्हता. पण बाबीकाकाच नमत्या सुरांत म्हणाले, "तसा बसला होता रे तो. मी बोलतसुद्धां होतो त्याच्याशीं."

"तुम्ही कशाला त्याच्याशीं बोलत बसलां होतात?" मुलगा एकदम म्हणाला.

तसें फणकारून बाबीकाका म्हणाले, "कशाला म्हणजे? मी बोलायचं नाहीं काय कुणाशीं? मी वाटेल त्याच्याशीं बोलेन. तूं रे कोण मला अडविणार?"

"वाटेल तें बोलतां म्हणून अडवितों. तुम्ही पैसे मागतां वाटेल त्याच्याजवळ आणि आम्हांला लाज वाटते मग. इथें कांहीं पैशांची झाडं लागलीं नाहींत तुमचं कर्ज फेडायला. मागितलेत कीं नाहीं पैसे त्याच्याजवळ?"

मुलाचें हें दरडाविणें घरभर ऐकूं गेलें आणि सगळें घर तिथें गोळा झालें. त्या घरांत सर्वांत वडील बाबीकाका होते आणि त्यांचा अपमान त्या सगळ्या लहान माणसांच्या देखत . . . बाबीकाकांना तें सहन झालें नाहीं. तिरमिरीसरसें उभे राहून ते ओरडले, " जा जा, विचारून ये त्याला. मी कशाला पैसे मागूं ? "

" मागतां तुम्ही. मला माहीत आहे. "

मुलानें असें गळ्यांतच घातल्यावर बाबीकाका एकदम शांत होत खालीं बसून म्हणाले, " मागतों एखादे वेळीं. मग काय झालं मागितले म्हणन ? आणि कां मागतों तें नाहीं विचारलंस तें? "

" आत्तां विचारितों. सांगा. कां मागतां पैसे लोकांच्याजवळ ?"

" बघतों आपला माझ्या बाजूचं कोण आहे तें—माझ्यावर कोणाची खरी माया आहे. तें तुला काय माहीत पोराला ? जगाची माया असते पैशावर. तुझ्या बापाजवळ जर दहा हजार रुपये असते तर तूं त्याला असा उलटून बोलला नसतास. मागीन मी पैसे जा. फेडा तुम्ही. पुष्कळ केलंय मीं तुमच्यासाठीं, तो अप्पा नाहीं बिसरला. तूं मात्र..."

हा धाकटा मुलगा आणखी पुष्कळ बोलायच्या विचारांत होता. बाकीचीं माणसें कावरींबावरीं होऊन संकोचानें उभीं होतीं, तरी त्याच्या बायकोचा चेहरा उजळत चालला होता. आपल्या नवऱ्यानें चांगले फटके मारिल्यासारखे या म्हाताऱ्याला एकदां बोलून घ्यावें अशी तिची फार इच्छा होती. मोठ्या सुनेनें बाहेर येऊन ऐकण्याचा धीटपणा केला नव्हता. आपल्या सासऱ्याला कोणीं तरी बोललें पाहिजे अशी तिचीहि इच्छा होती. पण असें असलें तरी त्याचा पाणउतारा व्हावा, चार माणसांत त्यांना लाज आणावी, असें मात्र तिला मुळींच वाटत नव्हतें. तिचा दीर कांहीं बोलण्याच्या तयारींत होता. तोंच जिन्यावर अप्पांचीं पावलें वाजलेली त्याला ऐकूं आलीं. अप्पांचा त्याला धाक होता. त्यांची शिस्त त्यांच्या देखत मोडण्याची त्याची अजून प्राज्ञा नव्हती. बापाशीं भांडून शेजाऱ्यांना तमाशा दाखवयाचा नाहीं, अशी अप्पांची सगळ्या घराला सक्त ताकीद होती. अप्पांची चाहूल लागतांच धाकटा एवढेंच म्हणाला, " तुम्हीं हें असं वेडंवाकडं बोलतां, म्हणूनच मीं तुमच्याशीं भाषण करीत नाहीं. "

अप्पा आले. सारीं आपापल्या ठिकाणीं चुपचाप झालीं. अप्पांच्या–पासून लपवून ठेविण्यासारखें आज कांहीं घडलें आहे याची जाणीव होऊन जो तो सांवरूं लागला. अप्पांच्या ध्यानांत आलें. पण सगळ्यांची इच्छा काय आहे हें ओळखून त्यांनीं न समजल्याचें सोंग केलें. आणि त्यांना पाहातांच बाबीकाकांनीं कण्हल्यासारखें केलें.

आंत येऊन धाकट्या सूनबाई जाऊबाईंना म्हणाल्या, " भाऊजींच्या लाडानं मामंजी फार चढून बसले आहेत. हे बोलले आज, म्हणून बरं झालं. कुणीं तरी त्यांना चांगलं खडसावलंच पाहिजे. "

मोठ्या सूनबाईंनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं. पण मनांतल्या मनांत ती आज सगळं नवऱ्याला सांगण्याचा बेत करीत होती.

रात्रीं बाबीकाका जेवणार नाहींत असा तिचा अंदाज होता. कारण दिवसभर ते दहा रुपयांचें चरले होते. नुकतीच पांच रुपयांना त्यांनीं एका माणसाला बोलतां बोलतां टांग मारिली होती. आणखी किती लोकांना त्यांनीं असें खर्चांत आणलें असेल याची तिला कल्पना करतां येईना बाबीकाकांनीं लोकांच्याजवळ असे पैसे मागावेत यांत तिच्या नवऱ्याची अब्रू जात नव्हती काय ? आपल्या पितृभक्त भोळ्या नवऱ्याला ती हें पटवून देणार होती.

विचार करीत तिनें पानें घेतलीं. पण आपल्या आधाशी सासऱ्याचें पान घेतलें नाहीं. नाहीं तरी आग्रह केल्याशिवाय जेवायचें त्यांना माहीत कोठें होतें ? पण आज नेमकें उलटें झालें. न बोलावितांच, सर्वांच्या आधीं बाबीकाका पानावर येऊन बसले. म्हणाले, "लौकर वाढ. मला भूक लागली आहे." दोघी सुनांनीं एकमेकींकडे पाहिलें. नजरेनें त्यांनीं एकमेकींना विचारिलें, 'आज पोटांत काय ब्रह्मराक्षस उठला आहे कीं काय यांच्या?"

बाबीकाका रोजच्यापेक्षां दोन घांस सरस जेवून उठले. आणि सुपारी चघळीत अप्पांनीं घातलेल्या अंथरुणावर येऊन पडले. सगळ्यांची निजानीज झाल्यावर अप्पांची बायको त्यांना म्हणाली, " आज माझं ऐकणार आहांत का ?"

अप्पा हंसत हंसत म्हणाले, " मी तुझं ऐकलं नाहीं असं कधीं झालं आहे का ? "

" काय पण बोलणं! एखाद्याला वाटेल नवरा अगदीं बायकोच्या मुठींत आहे. पण तुमच्या मनांत ऐकायचं नसलं म्हणजे तुम्ही सपशेल दुर्लक्ष करतां."

"कधीं केलंय असं सांग ? "

तें मी टिपून नाहीं ठेवलं. पण तुम्हांला सगळेच विषय आवडत नाहींत बोलायला."

"हो. पण मला न आवडणारा विषय तूं आत्तां काढतेस कशाला? दोघांना आवडेल असाच विषय आपण बोलूं."

"तें कांहीं नाहीं. आज तुम्हीं माझं ऐकून घेतलं पाहिजे. रागवा-यच नाहीं. टाळाटाळी–"

"विषय काकांचा असेल!" अप्पा हंसत म्हणाले.

"तुम्हीं कसं ओळखलंत?"

तुझे विषय मी नाहीं ओळखणार तर कोण ओळखणार? बरं पण सांग. ऐकतों. आज काय झालं? काकांनीं कुणाचीं पत्रं चोरू वाचलीं?"

"तें नेहमींचंच आहे. पण आज संध्याकाळीं भाऊजींचा एक मित्र आला होता, त्याच्याजवळ त्यांनीं पन्नास रुपये मागितले."

"आणि त्यांनीं दिले?"

"दिले, पण पांच रुपये दिले."

अप्पांनीं श्वास सोडिला. पण पुढं त्यांनीं विचारिलें, "तुला कसं समजलं?"

"चंदूनें सांगितलं आपल्या."

अप्पा थोडे रागावून म्हणाले, "म्हणजे, तुम्ही त्यांच्यावर पहारा ठेवता!"

" हो हो, ठेवायलाच पाहिजे पहारा. इतके दिवस नव्हतें ठेवीत. पण आतां ठेवायलाच पाहिजे. "

" कां ? "

" आज तुमच्या टेबलाच्या खणाला मामंजींनीं चावी लावली आणि दहाची नोट काढून घेतली. लक्षांत तरी आलंय का तुमच्या ? "

" तूं पाहिलंस ? "

" हो, मीं पाहिलं. आज पहिल्यांदाच पाहिलं, आणि तुम्हांला सावध केलं. "

" खरं सांगूं तुला ? " अप्पा बायकोला विश्वासांत घेऊन म्हणाले, " मला हें सगळं माहीत आहे. "

" आणि तरी तुम्ही– "

" ऐकून घे जरा. काकांनीं बरेच वेळां असे पैसे घेतलेले आहेत. लोकांच्याजवळ मागितलेले आहेत. शेवटीं मला दोघांचौघांनीं विचारलं कीं, ' तुम्ही आपल्या बापाला पैसे देत नाहीं का ? ' त्यांना काय सांगणार मी ? पण सर्वांना सांगून ठेवलं आहे कीं त्यांनीं पैसे मागितले तरी तुम्ही देत जाऊं नका. आणि दिलेत तर माझ्याजवळून घेऊन जात जा."

" पण याचा अर्थ काय ? तुम्ही बापाचीं कर्ज फेडा आणि घरांत आम्हांला महागाईचा आणि काटकसरीचा पाढा ऐकवा."

"चालायचंच."

" चालायचंच काय ? " त्यांची बायको मोठ्यानें म्हणाली.

" अग ताटांत सांडलं काय, आणि वाटींत सांडलं काय– "

" पण तुम्ही त्यांना एकदां सांगा. म्हणावं, हें बरं नाहीं. काय हवं तें मागा आमच्याजवळ. खायला हवं असलं तरी सुनांच्याजवळ मागा. नाहीं का कुणी म्हणतं आहे ? "

" अग, तुम्ही दोघी चांगल्या आहांत म्हणूनच हें सगळं नीट चाललं आहे– "

" मग मामंजी नेहमीं हॉटेलांत कशाला जातात ? "

" तें तुला काय माहीत ? " अप्पांनीं एकदम रागानें विचारिलें.

तशीं नाकावर बोट ठेवून ती म्हणाली, " शू: ! हळू बोला. बाहेर ऐकत उभे असतील ते. "

" दाखव कुठें उभे आहेत ते. उगीच एखाद्यावर आळ घ्यावा म्हणजे काय ? "

तिनें अप्पांचा हात धरिला आणि हलक्या पावलानें दाराजवळ येऊन कडी काढिली, तों खरेंच बाबीकाका समोर उभे होते. दार अचानकपणें उघडिलें गेल्यामुळें ते गोंधळून गेले. पण स्वयंपाकघराकडे तोंड फिरवीत ते चांचरत म्हणाले, " तहान लागली होती, म्हणून पाणी प्यायला आलों. "

आपल्यापुढें बापाला चांचरत बोलण्याची वेळ यावी याचें अप्पांना वाईट वाटलें. त्यांनीं चटकन् पुढें होऊन त्यांना पाणी दिलें. पण ती पुटपुटत

होती, " पाण्याचं तांब्या–भांडं त्यांच्या उशाशींच आहे. आणि म्हणे, पाणी प्यायला आलों. आणि हें यांना खरं वाटलं ! "

" काय म्हणालीस ?" पुन्हा खोलीचें दार बंद करीत अप्पांनीं विचारिलें.

" पाण्याची सबब तुम्हांला खरी वाटली ना ? "

" नसेलहि खरी. पण तुला एक सांगूं ? अनेक वेळां सांगितलंय, तेंच आज सांगतों. रागावूं नकोस. कांहीं झालं तरी ते माझे वडील आहेत, आणि त्यांनीं आमच्यासाठीं फार हाल सोसले आहेत. गरीबीमुळें त्यांचं लग्न उशीरां झालं. आणि पांच वर्षांत आम्हीं दोन मुलगे होऊन सगळा संसार आटपला. तेव्हांपासून तीस वर्षें तरी, आम्हांला सावत्रपणा नको म्हणून त्यांनीं एकटेपणा पत्करला आहे. त्यांनीं आम्हांला भरवलं आहे. आमचीं दुखणींबाणीं काढलीं आहेत. आमचं शिक्षण आणि संगोपन करतांना ते म्हातारे झाले आहेत. त्यांनीं माझे पैसे घेतले तर बिघडलं कुठें ? तूं वाईट वाटून घेऊं नकोस. पण ते आमचे नुसते वडील नाहींत. आई-सुद्धां आहेत. आईसुद्धां काढणार नाहीं, अशा एकेक खस्ता त्यांनीं आमच्या काढल्या आहेत. त्या एकेक गोष्टीची आठवण झाली कीं त्यांच्या या गोष्टींचा उच्चार करणं मला मोठं पापाचं वाटतं. आतां त्यांचे असे कितीसे दिवस राहिले आहेत ? ही जाणीव माझ्या भावानंहि ठेवायला हवी आहे. तूंसुद्धा हें— "

" पण आम्हांला याचा त्रास होतो. " अप्पांची बायको खालच्या सुरांत म्हणाली.

" होतो ना. पण मला त्यांना दुःख द्यायचं नाहीं. त्यांना काय करायचं आहे तें करूं दे. हें पाहा, माणूस जगांत एकटचा कुणाचा कधीं

नसतो. तो बायकोचा असतो तसा तो मुलांचाहि असतो, बापाचाहि असतो, भावाचा, बहिणीचा ... काका आहेत तंवर मी आधीं त्यांचा आहें, मग तुझा आहें. गैरसमज करून घेऊं नकोस. पण बाबीकाकांनीं फार कष्ट, फार मोठा मनस्ताप आणि भयानक एकाकीपणा सोसला आहे. त्याची आठवण झाली कीं मला त्यांचे सगळे गुन्हे माफ करावेसे वाटतात. तू जर माझ्यावर प्रेम करीत असशील तर माझं एवढंच म्हणणं आहे कीं तूं माझ्या बापावरसुद्धां अशीच माया कर. समज, कीं तो तुझाच बाप आहे."

बोलतां बोलतां अप्पांचे डोळे पाण्यानें भरून आले. त्यांनीं बायकोचा हात धरिला, म्हणाले, " ये, नीज आतां. पण आतां, या वेळीं आपण दोघं एकमेकांशीं बोलून मन मोकळं करतों आहोंत तसं त्यांना आहे कुणी बोलायला? एक प्रकारें ते एकटे आहेत या घरांत. मग आपल्याबद्दल कोण काय बोलतो हें ते ऐकत राहातात. माझा भाऊ त्यांच्याशीं आठआठ दिवसांत भाषणसुद्धां करीत नाहीं. आणि मीहि जर तसाच वागलों, तर या घरांत त्या म्हाताऱ्या जिवाला सुख कसं लागेल तें सांग."

अप्पांची बायको कांहीं बोलली नाहीं. पण तिच्या अंतःकरणांत आज एक सहानुभूतीचा नवा पाझर निर्माण झाला.

दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें ती पहांटे उठली. तिनें चूल पेटविली. बंबांत जळण घातलें. मामंजी लौकर स्नान करतात म्हणून तिनें त्यांचें पाणी काढिलें. आणि धोतराच्या निऱ्या करीत करीत ती त्यांना हांका मारायला आली, तों बाबीकाकांनीं दत्ताच्या तसबिरीमागील पेढ्यांची पुडी काढिली होती. एक पेढा त्यांच्या तोंडांत होता. अर्धेमुर्धे दांत पडलेलें तें तोंड लुगुलुगु हालत होतें. आणि हातानें पेढ्यांची पुडी चालली होती. सूनबाई स्वतःशींच हंसली. हलक्या पावलांनीं माघारीं गेली. बाबी-

काकांचें काम निर्वेधपणें पार पडलें. ती पेढ्यांची पुडी लोंबकाळणाऱ्या कोटाच्या खिशांत जाऊन पडली.

पण धाकट्या सूनबाईंचा मनसुबा वेगळा होता. या घरांत ती जुनी झाली नव्हती. स्वभावानें थोडी खोडसाळ होती. ज्याचें माप त्याच्या पदरांत घालण्याची तिला खुमखुमी होती. नात्याचे नाजुक पाश समजण्याएवढी ती वयानें व मनानें वाढलेली नव्हती. आणि तशाच उथळ मनाचा तिचा नवरा तिला साथ करीत आला होता.

मामंजी न्हाणीघरांत आंघोळीला गेलेले पाहातांच तिनें बाबीकाकांच्या खुंटीला लोंबकाळणाऱ्या कोटाच्या खिशांत हात घातला. त्यांतलें पैशाचें पाकीट काढलें. पेढ्यांची पुडी बाहेर निघाली आणि ट्रंकेची किल्ली काढून घेऊन तिनें कोट व्यवस्थित खुंटीवर अडकविला. पुन्हा एकदां ती आंतल्या बाजूला डोकावून आली. बाबीकाका तोंडानें कांहीं म्हणत धोतर नेसीत होते. म्हणजे अजून संध्या व्हायची होती. पूजा आटपायची होती. खूप वेळ होता. ती पुन्हा बाहेरच्या खोलींत आली. किल्ली लावून बाबीकाकांची पेटी उघडायची खटपट करूं लागली.

बाबीकाकांच्या संध्येचें मांडणें, पूजासाहित्य ठेवणें, हें काम धाकट्या सूनबाईंचें होतें. बाबीकाका पाटावर येऊन बसतात तों पळी नाहीं. नैवेद्याच्या वाटींत दूध नाहीं. त्यांनीं पुटपुटल्यासारखें केलें, "हें काय? पळी नाहीं, दूध नाहीं. काय करते आहे सूनबाई?

तों अप्पांची छोटी मुलगी कुठूनशी एकदम येऊन म्हणाली, "काकू तुमच्या पेटीचं कुलूप काढते आहे."

मुलीचें बोलणें ऐकतांच थोरल्या सूनबाईंच्या छातींत धस्स झालें. हातांतलें भांडें तसेंच टाकून बाबीकाका तटकन् उठून उभे राहिले आणि

' काय म्हणालीस ? ' असें ओरडून ते तरातरा बाहेरच्या खोलींत आले. सूनबाईनीं कुलूप काढून हातांत घेतलें होतें. पेटीचें झांकण अर्धवट वर उचललें होतें,-तों मामंजींचा शब्द ऐकतांच तें हातांतून निसटून खालीं आपटलें. त्याचा धाडकन् आवाज झाला आणि ती चटकन् उठून उभी राहिली. बाबीकाकांचे ओंठ लुबुलुबु कांपूं लागले. हातपाय थरथरूं लागले. ते वेळीं–अवेळीं पाणी झिरपणारे डोळे लाल होऊन गेले. सूनबाई निसटून जाऊं लागलेली पाहातांच त्यांनीं आपल्या शुष्क होत चाललेल्या, कातडी लोंबू लागलेल्या दोन्ही हातांनीं दरवाजा अडवून धरला. आणि संतापानें शब्द उमटत नव्हते तरी ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, " काय करीत होतीस ? "

सूनबाई हबकून गेली. चोरी पकडायला गेली आणि स्वतःच गुन्हेगार म्हणून सांपडून बसली. आणि तीसुद्धां प्रत्यक्ष सासऱ्यासमोर ! ती कांहीं बोलेना तेव्हां बाबीकाकांनीं तिच्या हातातलें कुलूप हिसकावून घेतलें आणि तिच्यावर हात उगारून ते म्हणाले, " चोऱ्या करतेस ? माझं कुलूप कशाला काढलंस ? आणि किल्ल्या-"

त्यांनीं कोटाकडे पाहिलें. कोट या वेळीं लोंबकाळत नव्हता. धडपडत, थरथरत ते कोटाजवळ गेले. त्यांनीं खिशांत हात घालून पाहिलें. पैशाचें पाकीट, पेढ्यांची पुडी, किल्ल्या—सगळें नाहीसें झालें होतें. बाबीकाका हिरवेनिळे होत पुन्हा ओरडले, " चांडाळणी--"

सूनबाई दारांतून आंत जात होती तों बाबीकाकांनीं हातांतलें कुलूप तिच्या अंगावर फेंकिलें.

तोंच त्यांचा धाकटा मुलगा तिथें धांवत आला. बायकोला मागें सारून तो ओरडला, " काका, काय करताहांत हें ?"

" गाढवा, हरामखोरा, तुझी बायको माझी ट्रंक फोडते ? माझे खिसे तपासते ? ......" बाबीकाका शिव्या देऊं लागले. मुलगा त्यांना अडवूं लागला.

त्या आवाजानें जागें होऊन अप्पा आले. त्यांना पाहातांच बाबीकाका नुसतेच थरथरूं लागले. रागानें बेभान होत त्यांचे ओंठ हालूं लागले. हनुवटी कांपूं लागली. मुलाला पाहातांच ते मोठ्यानें गळा काढून रडूं लागलें आणि आपल्याच थोबाडींत मारून घेऊं लागले.

अप्पांनीं त्यांचे हात धरिले, आणि 'काय झालें, काय झालें' म्हणून त्यांना सांवरूं लागले. तों बाबीकाका अधिकच लटपटूं लागले. आणि डोळे पांढरे करीत ते अप्पांच्या अंगावर कोसळून पडले.

तेव्हांपासून निमित्ताला टेंकलेले बाबीकाका आजारी झाले. आठ दिवसांत बाबीकाका ऐशीं वर्षांचे दिसूं लागले. धाकटा मुलगा आणि धाकटी सूनबाई त्यांना डोळ्यासमोर नको असे. अप्पा आणि त्यांची बायको काकांची सेवा जीव लावून करीत होती. पण पाण्यांतली नाव आतां हेलपाटूं लागली होती. पाणी नावेंत चढत होतें. खुंटीवरचा कोट आणखीच लोंबकाळूं लागला होता. काय होणार हें अप्पांना स्पष्ट दिसत होतें. बाबीकाकांनाहि त्याची कल्पना येऊं लागली होती. ज्याला इतकीं वर्षें आपण लोंबकाळून होतों तिथून आपले हात सुटत चालले आहेत, आपण खोल कुठें तरी चाललों आहोंत, असें त्यांचें त्यांनाच वाटत होतें. आपला हाडकुळा पंजा ते वरचेवर उचलीत आणि सारा येत चाललेल्या डोळ्यांसमोर धरून त्याच्यावरची आयुष्यरेषा पाहात. एकेक दृश्य मावळत चाललेल्या त्या डोळ्यांतून वेळीं–अवेळीं पाणी येऊं लागलें. मधूनच कांहीं तरी आठवण होऊन ते हांका मारीत, " अप्पा ! "

पण अप्पांनीं जवळ येऊन विचारिलें कीं ओंठ थरथरवीत म्हणत, "कांहीं नाहीं. उगाच हांक मारली."

पण दोन चार वेळां असें झाल्यावर अप्पांनीं ओळखिलें कीं हें खरें नाहीं. बाबीकाकांचा जीव कुठें दुखावितो आहे याची त्यांना कल्पना होती. डॉक्टरांनीं सांगितलें कीं, आतां दोनचार दिवसांचीच सोबत आहे. दोन दिवसांची सोबत ! अप्पांच्या पोटांत कालवून निघे. पण त्यांना छाती होत नव्हती. म्हणून ते वाट पाहात होते. पण बाबीकाका त्यांना बोलावीत आणि पुढें कांहीं बोलत नसत. अखेर आज अप्पांनीं निर्धार केला आणि ते बाहेर गेले.

थोड्या वेळानें अप्पा आणि एक वृद्ध स्त्री आंत आली. तिचे केंस पिकून आंबाडी झाली होती. हातांपायांवर सुरकुत्या आल्या होत्या आणि दुःखानें तिच्या चेहऱ्याची कळा पार बदलून गेली होती. ती आंत येतांच अप्पांनीं तिला बसायला खुर्ची दिली. पण थरथरत्या अंगानें ती स्त्री बाबीकाकांच्या पायगतीं उभी राहिली. संकोचानें, लज्जनें तिचा चेहरा गोरामोरा झाला होता. आणि तरीहि तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहात होत्या. चाहूल लागतांच बाबीकाकांनीं डोळे उघडिले. अप्पा खोलीच्या बाहेर गेले. त्यांनीं दरवाजा ओढून घेतला.

घरांतील माणसांचे चेहरे प्रश्नचिन्हांकित झाले. पण घरांत अप्पा होते. म्हातारा मृत्युशय्येवर होता. उच्चार करण्याचें धाड्स कोणीं केलें नाहीं.

दार ओढून घेतल्याबरोबर ती वृद्धा बाबीकाकांच्या जवळ जाऊन म्हणाली,—

" मी आलें आहें. "

आपला हात तिच्या केंसावरून फिरवीत दुःखानें हिंदकळत बाबी-काका म्हणाले, " कशी आलीस ? तुला भेटावं अशी माझी फार फार इच्छा होती. मी आतां दोन दिवसांचा सोबती. "

ती स्त्री एकदम त्यांच्या तोंडावर हात ठेवून म्हणाली, " असं बोलूं नका, तुम्ही मला हवे आहांत. मी तुम्हांला जाऊं देणार नाहीं. "

ती एकदम त्यांच्या अंगावर पडली. काकांचा कृश, फिकट झालेला, दाढी वाढलेला चेहरा, आपल्या झिरमिळचा पडूं लागलेल्या हातानें ती कुर-वाळूं लागली. तिचे अश्रू त्यांच्या चेहऱ्यावर पडूं लागले. काकांनीं तिला आपल्या दोन्ही हातांनीं कवटाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या डोळयांतून आटून चाललेले अश्रू झिरपूं लागले. ते म्हणाले, " तूं आलीस हें बरं झालं. तूंच मला खरी सोबत केली आहेस. "

" तुम्हीसुद्धां मला. . . पण तुम्ही जाऊं नका. जाऊं नका हो. . . "

काका काय बोलणार ? आपण जातों आहोंत हें त्यांना कळत होतें. ते म्हणाले, " मी तुला निराधार करणार नाहीं. तुझी सोय . . . "

आपले हुंदके आंतल्या आंत दाबून धरीत ती पदराचा बोळा तोंडांत घालूं लागली. काका म्हणाले, " मन मारूं नकोस. अखेरची भेट आहे ही आपली. मन मोकळं कर. "

त्यांनीं तिचें मस्तक आपल्या छातीवर घेतलें. गदगदून रडतांना तें म्हातारें शरीर हादरत होतें. जाणाऱ्या काकांना धरून ठेवीत होतें काकांनीं विचारिलें, " बाबी नाहीं आली ? "

" शाळेंत गेली आहे."

" तिला माहीत आहे मी आजारी आहें हें ? "

" नाहीं. कळलं असतं तर इथें यायचा तिनं ध्यास घेतला असता. इथें कशी येणार ! म्हणून तिला सांगितलं नाहीं. "

पुन्हा थांबून ती म्हणाली, " तुम्ही गेल्या आठदहा दिवसांत आलां नाहींत. रोज बाबीला खाऊ, कापड, आणीत होता . . . तिला सांगितलं तुम्हीं गांवीं गेलां आहांत. "

काका म्हणाले, " बाबी कितवींत आहे ? इंग्रजी पांचवींत ना ? "

" हो. "

" मी सांगत आलों तसं तिचं सगळं कर. माझी मुलगी आहे ती. वेळ येईल तेव्हां अप्पाला विचारीत जा. "

दिवेलागणी झाली होती. अप्पांनीं दारावर टकटक केलें. दार उघडून ते आंत आले. ती स्त्री समजली. तिचे हुंदके तिला अनावर होत होते. पण आक्रोश करायला ती त्यांची लग्नाची बायको नव्हती. यातनांनीं तिचें शरीर गदगदून निघत होतें. ती तशीच खालीं वांकिली आणि तिनें काकांचे पाय धरले. ते पाय आणि ते हात कांपत होते. अखेर ती निघाली. चार वेळां दाराशीं जाऊन परत फिरली, आणि शेवटीं तिला त्या खोलींतून बाहेर पडावें लागलें.

ती गेली आणि हळूहळू बाबीकाकांच्या खोलींत घरांतील माणसें जमूं लागलीं. काकांचें रहस्य समजल्यानें आज कोणी रागाविलें नव्हतें. आणि

काकांनाहि कशाची फिकीर वाटत नव्हती. त्या रात्रीं दहापर्यंत बाबी-काकांचें बरें होतें. सगळीं झोंपलीं. अप्पा तेवढे काकांच्या खोलींत झोंपायला होते.

अप्पा एकटेच आहेत असें पाहून बाबीकाका म्हणाले, "माझ्या उशाशीं किल्ली आहे. मी गेलों कीं माझी ट्रंक उघड. त्यांत तुला निरोप आहे. तशी व्यवस्था कर."

अप्पा म्हणाले, "असं काय बोलतां काका ?"

"नाहीं रे बाबा. ऐंशीं वर्षं आत्तांच भरलीं. तयारी करतों आहें. पण आंवरत नाहीं. ही रेषा–हातावरची ही रेषा अगदीं पुसट होत चालली आहे."

बाबीकाकांनीं डोळे मिटून घेतले. अप्पांनीं औषध त्यांच्या तोंडांत घातलें. आणि विचार करीत ते अंथरुणावर पडले. मग एकदोनच्या पुढें केव्हां तरी त्यांना झोंप लागली. काकांचा श्वास अगदीं संथपणें चालू होता.

पण सकाळीं अप्पा जागे झाले तेव्हां बाबीकाका जाग्यावर नव्हते. देह होता; पण काका कधीं निघून गेले तें त्यांना समजलेंसुद्धां नाहीं. सगळ्यांना वाटलें कीं तें त्यांचें त्यांनासुद्धां समजलें नाहीं.

अप्पांनीं बाबीकाकांची पेटी उघडली. तींत चारच वस्तू होत्या. एक पैशांची पिशवी. एक बंद पाकीट. आणि दोन फोटो. एक त्या कालच्या स्त्रीचा. दुसरा तेराचौदा वर्षांच्या मुलीचा. अप्पांनीं पाकीट

फोडिलें. तें पत्र त्यांनाच होतें. ते वाचूं लागलें,– " ट्रंकेंत एक पिशवी आहे. तींत तीन हजार रुपये आहेत. ते बाबीच्या लग्नासाठीं आहेत. बाबी माझी आहे. तिचें लग्नच व्हावें अशी माझी इच्छा आहे. तिची आई सौ. सोनीबाई मागेल तेव्हां तिच्याजवळ ते द्यावेत."

रात्रीचे अकरा वाजले होते. पण एक वाजल्यासारखें वाटत होतें. संध्याकाळपासून सुरू झालेली पावसाची झड अजून ओसरिली नव्हती. रस्त्यावर सामसूम होती आणि वातावरणावर निद्रेची गुंगी चढत होती. पण खिडक्यांच्या तावदानावर पावसाच्या सरींचे फटके अजून बसतच होते. मधूनच विजांचा लखलखाट चमकावीत होता आणि थांबून थांबून 'म्हातारीचें हरभरे दळणें' अजून चालूंच होतें ! झाडांच्या पानांमधून गळणाऱ्या थेंबांचा घराच्या पत्र्यावर तड्तड् असा आवाज होत होता. आणि झाडाच्या बुंध्याशीं शेजारच्या टांगेवाल्यानें बांधलेलें टांग्याचें तट्टू आपल्या टापांचा आवाज जागच्या जागींच करीत होतें. झोंपेची गुंगी येतां येतांच मला सारखें वाटे, रस्त्यावर कोणी माणूस सतत चालतोच आहे. पण चालतो आहे तरी किती ! आणि सारखा तोच आवाज. तेंच वाहाणा फरफराविणें आणि लांब जात नाहीं कीं जवळ येत नाहीं. कीं पुष्कळ माणसें त्याच रस्त्यानें आणि त्याच चालीनें जात आहेत ? म्हणून उठून खिडकींतून पाहिलें. तों टांग्याचें तट्टू माणसासारखें पायानें खुरम्खुरम् करीत उभें होतें. आणखी थोडी लांबवर नजर टाकिली तों गस्त घालणाऱ्या शिपायाशिवाय कोणी दिसलें नाहीं कीं त्याच्या दंडुक्याच्या आवाजाशिवाय आवाजहि ऐकूं आला नाहीं. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंदिलाच्या भोंवतीं पावसाच्या धारा कांय

त्या झिमझिमत होत्या एवढेंच ! कंदील, पाऊस, शिपाई आणि घोडा एवढेच काय ते जागे होते. बाकी सर्व झोंपी गेले होते. काय गंमत आहे जीवनाची ? दिवसभर सगळीं किती बळवळ करीत असतात ! आणि रात्रीं मग सगळें अगदीं थंडावून जातें असें कांहींसें मनांत येत येत मी पुन्हा अंथरुणावर पडलें. अंगाभोंवतीं रग लपेटून घेतला आणि हळू हळू स्वप्नें पाहूं लागलें–

वाटलें कीं कोणी तरी दारावर ठोठावितें आहे. ‘ मनूताई, अहो मनूताई, उठा ’ असें म्हणतें आहे. ‘ ऐकलंत कां? मी आलें आहे. उठा. अहो दार उघडा. ’ मीं डोळे उघडिलें आणि पुन्हां मिटून घेतले. स्वतःशींच हंसलें. स्वप्नांतल्या हांकांना उत्तरें द्यायला लागलें, आणि ठोठाविण्याला दारें उघडायला लागलें तर वेडच लागलें म्हणावयाचें. ह्या कुशीवरून त्या कुशीवर होतें आहे तों पुन्हां आपलें ‘ अहो मनूताई, दार उघडा. मी चंपूताई आलें आहें. ’ मग मात्र मी चपापलें. कोणी तरी आलें होतें खरेंच! पण या चंपूताई कोण? असें म्हणत उठलें, दिवा लाविला आणि ‘ कोण आहे? ’ असें उगाचच दरडावीत मीं दार उघडिलें. तों एक बाई ट्रंक–वळकटी आणि फराळाचा डबा घेऊन दारांत उभी ! पाण्यानें निथळत, थंडीनें काकडत, पुढें येऊन ती म्हणाली, ‘ मनूताई.... ’ मीं लगेच ओळखिलें. माझ्या माहेरची चंपूताई शित्रे ही. ‘ या ना ’ आंत या. आतां या वेळीं कोणीकडे? आणि किती भिजला आहांत? ’ मीं त्यांचें सामान आंत घेतलें. त्यांनीं कपडे बदलिले. गरम गरम चहाचा कप त्यांच्यापुढें ठेवून मीं विचारिलें, ‘एकटयाच आलांत? बरोबर कोणी नाहीं? ’

चंपूताईंनीं मान हलविली. ‘ एकटींच आलें, तसा कांहीं अंधार नाहीं बाहेर. ’

'पण झुरळाला भिणाऱ्या तुम्ही अंधाराला आणि एकटेपणाला भ्यायला नाहींत म्हणजे आश्चर्य आहे. बरं चला, निजा आतां. सकाळीं बोलूं.'

चंपूताई दमल्या होत्या. त्या लगेच अंथरुणावर पडल्या. त्यांना झोंप लागली कीं नाहीं कोण जाणे. मी विचार करीत होतें कीं कोंकणांतून इतक्या लांबून ही बाई एकटी आली कशी ? आणि कशाला ?

सकाळीं त्यांना मीं विचारिलें, 'चंपूताई, बरोबर कां नाहीं आणलंत कोणाला ?'

'कोणाला आणायचं ?'

'यजमानांना घेऊन यायचं बरोबर.' मी हंसत हंसत म्हणालें.

'ते इथेंच आहेत.' चंपूताई हंसल्या नाहींत कीं चेहऱ्यावरची सुरकुती इकडची तिकडे हलली नाहीं.

'इथेंच आहेत ? कधीं आले ?'

'तिकडे गेलेच नाहींत तर ......'

'म्हणजे काय ?'

'म्हणजे माझं कर्म.' चंपूताई कपाळाला हात लावून खालीं बसत म्हणाल्या. 'मान सांगावा जनांत आणि अपमान ठेवावा मनांत अशी एक म्हण आहे. पण वेळ आली कीं बोलावंच लागतं.'

'काय झालं ?'

' तेंच तर मला कळत नाहीं. तीन चार वर्षें झालीं ते इथेंच आहेत. त्यांचाच शोध घ्यायला मी इथं आलें आहें. '

' पण त्यांचा पत्ता ? '

'आहे मला माहीत. ' चंपूताईंनीं कमरेच्या पिशवींतून एक चुरमडलेला कागद काढला. त्यावर त्यांच्या यजमानांचा पत्ता होता. तो पुन्हां पिशवींत ठेवून चंपूताई उठल्या ! झिजलेल्या वाहणा त्यांनीं पायांत घातल्या. आणि रस्ता चालूं लागल्या. मी त्यांच्याकडे पाहत होते. चंपूताईंचा उंच किडकिडीत देह पोक काढूनसुद्धां हेलकावीत होता. लुगडयाचा घोळ डाव्या पायावरून उजव्या पायापर्यंत घोळत होता. हाडाला कातडी गुंडाळलेले ते किडकिडीत हात खांद्यापासून जसे कांहीं लोंबकाळत होते. तरातरा चालल्यानें मान मधून मधून हालत होती आणि आवळून घेतलेल्या केंसांचा भला मोठा अंबाडा मात्र जागच्या जागीं घट्ट होऊन बसला होता. या अनोळखी गांवांत ह्या बाईला पत्ता तरी कसा सांपडेल असें म्हणत मी स्वयंपाकाच्या तयारीला लागलें.

दुपारचे दोन अडीच वाजून गेले तरी चंपूताईंचा पत्ता नाहीं. वाटलें, कीं बाई वाट चुकली बहुधा ! त्यांना शोधावें तरी कोठें ? कोणाला पाठवावें ? मीहि जेवायची थांबून राहिलें होतें. तीन..साडेतीन..चार वाजले तेव्हां चंपूताई घामाघूम होऊन आल्या. त्यांचा काळासांवळा चेहरा तांबरून गेला होता. त्यांचे बारीक आणि निस्तेज डोळे श्रमून गेले होते. आणि थकव्यानें त्यांच्या कपाळावरची शीर ताठ झाली होती. हातापायाच्या शिरा टरटरून फुगल्या होत्या. त्यांना पुष्कळच पायपीट करावी लागली होती हें दिसतच होतें. जेवायचीं पानें घेऊन एकमेकींसमोर बसत मीं विचारिलें, 'सांपडला का पत्ता ? '

'हो, सांपडला ! ' चंपूताई दमल्या होत्या, थकल्या होत्या, पण कोठें तरी आशा पालविली होती.

'मग भेट झाली का यजमानांची ? '

'हो, झाली ना ' चंपूताई किंचित् हरखून म्हणाल्या. 'भेट झाली, बोलणं झालं; म्हणालेत कीं आज रात्रीं येतों तिकडे. म्हणजे इथं येणार आहेत ते. चालेल ना ? मग इथून ते मला घेऊन जातील. '

मीं मनांत म्हटलें बरें झालें. असेल कांहीं नवराबायकोचें म्हणून जास्त कांहीं विचारिलें नाहीं. नुसतेंच म्हणालें, 'आतां जेवा पोटभर; सावकाश जेवा–तुमच्या मनासारखं झालंय ना?'

चंपूताईंनीं नुसतीच मान हलविली. त्यांचें लक्ष माझ्याकडे नव्हतें, कसलें तरी स्वप्न पाहण्यांत त्या गुंगल्या होत्या. जेवण झाल्यावर त्यांनीं आपली ट्रंक उघडिली. सामान इकडलें तिकडे केलें. एकदां फराळाचा डबा उघडून पाहिला. पुन्हां लावून ठेविला. पैसे दहा वेळां मोजून पाहिले. पुन्हां जागच्या जागीं ठेविले.

संध्याकाळीं साडेसहाला चंपूताईंनीं नीट वेणी घातली. तोंड धुतलें. डाळिंबाच्या दाण्याएवढें कुंकू लाविलें. हातावर पिठासारखी पॉवडर घेऊन त्यांनीं सगळ्या चेहऱ्याला लाविली. मानेवर, नाकावर, गालाच्या एका भागावर पॉवडरीचा थर दिसूं लागला; आणि मग त्यांनीं पातळ बदलिलें. त्या अस्वस्थ होऊं लागल्या. त्यांना एका जागीं स्वस्थ बसवत नव्हतें. कोणाजवळ मन घालून बोलवत नव्हतें. इकडून तिकडे उगाचच हेलपाटे घालीत त्या रात्र होण्याची वाट पाहात होत्या. नवऱ्याची वाट.... नववधू आणि प्रौढा सारख्याच आतुरतेनें पाहातात तर !

—सात वाजतां दिवे लागले. चंपूताई पांच पांच मिनिटाला घड्याळ पाहात होत्या. साडेसातच्या सुमारास त्यांनीं मला विचारिलें, " तुमचं हें घड्याळ बरोबर आहे ना ? '

' आहे ना. किती वाजतां येणार आहेत ? '

' साडेआठला. '

' मग अजून एक तास अवकाश आहे. चहा देऊं का करून तुम्हांला? '

' नको नको. मला नको. पण ते आले म्हणजे बरीक आपण चहा देऊं हं त्यांना ! चालेल ना ? '

' इश्श् ! न चालायला काय झालं ? "

जरा थांबून चंपूताई म्हणाल्या, ' सकाळपासून मी माझ्याच नादांत आहे. कांहीं काम असलं तर सांगाना मला. '

' काम कशाला करायला पाहिजे ? तुम्ही खुशाल मोकळ्या मनानें राहा. तुम्ही पाहुण्या आहांत माझ्या. '

चंपूताई माझ्यासमोर बसत म्हणाल्या, ' अगदीं वेड लागल्यासारखं झालं आहे. कशांत लक्ष लागत नाहीं. चार वर्षं झालीं मी तिकडे आणि हे इकडे, म्हटलं आपणच जावं, आपला नवरा आहे आपणच भेटावं, घरीं चला म्हणावं. '

' येणार आहेत का ? '

'हो. तुला घेऊनच जातों असं म्हणाले. मला वाटलं होतं, त्यांच्याशी खूप भांडावं लागेल, वाद करावा लागेल, डोकं फोडून घ्यावं लागेल पण

तसं कांहीं एक झालं नाहीं. वेळ बरी लागली म्हणायची घरून निघतांना.' चंपूताईंनीं रस्त्याकडे नजर टाकिली. एकदां घड्याळाकडे पाहिलें. आठ वाजून गेले होते. मीं पानें घेतलीं. त्यांना म्हटलें, 'मुलांच्या बरोबर तुम्ही जेवणार का ? मग ते आल्यावर तुमचा खोळंबा नको.'

चंपूताईंनीं तोंडावर हात ठेविला. म्हणाल्या, 'अग बाई, मी विसरूनच गेले; हे म्हणाले होतें कीं मी तुला जेवायलाच घेऊन जाईन. आतां तुमचं अन्न फुकट जाईल का मनुताई ?'

'नाहीं नाहीं, आमचं अन्न फुकट गेलं तरी चालेल. तुम्ही जा त्यांच्याबरोबर जेवायला.'

'पण माझं मेलीचं लक्ष . . .' असें म्हणत चंपूताई बाहेरच्या खोलींत गेल्या. दारापर्यंत त्यांनीं हजार खेपा घातल्या. खिडकीतून हजार वेळां रस्ता न्याहाळून बघितला आणि इकडे घड्याळांत साडेआठ, नऊ, साडेनऊ वाजून गेले तरी चंपूताईंच्या यजमानांचा पत्ता नाहीं. त्यांना ओशाळल्यासारखें झालें. मला चमत्कारिक वाटलें. चंपूताई मग रागावून हातवारे करीत म्हणाल्या, 'नेहमींचंच आहे हें ! आत्तां एक इथं आहेत पण घरीं होते तेव्हांसुद्धां हीच लक्षणं ! वेळेवर यायचे नाहींत. जेवायचे नाहींत. जातील तिकडचेच होतील. बायको वाट पाहाते आहे त्याची पर्वा नाहीं. आतां चार वर्षांनीं भेटलें पण त्यांना त्याची किंमत कुठें आहे ! बायको आवडत नाहीं आणि बाहेर उकिरडे फुंकायला हवेत मग बायको केली कशाला?'

मी म्हणालें, 'रागावूं नका चंपुताई. घर सापडलं नसेल. कोणी आलं असेल. अजूनसुद्धां येतील, नाहीं तर उद्यां सकाळीं येतील.'

'येतील तर येऊं देत. मला तोंड पाहायचं नाहीं त्यांचं.' चंपुताई हातवारे करूं लागल्या. 'भटाभिक्षुकाची मुलगी मी. भटाच्याच घरीं द्यायला

हवी होती. पण माझ्या बापाला वाटलं कीं गृहस्थाघरीं द्यावी. जास्ती सुख लागेल म्हणून कर्ज काढून पांचशें रुपये हुंडा दिला. पांचशें रुपये खर्च केले. तेव्हांचे हजार म्हणजे आजचे दहा हजार आहेत मनूताई. कर्ज फेडतां फेडतां नाकीं नऊ आले माझ्या बापाच्या आणि ह्यांनीं मला जन्मभर जशी पत्र्यावर वाळत घातली आहे.'

मी काय बोलणार? भोगणारी बिचारी चंपूताई होती. तिच्या जिवाचें वारापाणी होत होतें. आणि तें नुसतें बघत राहण्याशिवाय माझ्या हातीं कांहीं नव्हतें. मला वाटे कीं, आपल्याला कोणी नाहीं, म्हणून आपण दु:खी. पण चंपूताईंचा नवरा चांगला जिवंत असूनहि तेंच. एकपुतीहि रडते आणि सातपुतीहि रडतेच! चंपूताईंनीं बारा वाजेपर्यंत वाट बघितली पण तो गृहस्थाघरचा माणूस कांहीं आला नाहीं.

सकाळीं चंपूताई पुन्हां पायांत वाहाणा घालून निघाल्या. दुपारीं बारा वाजतां परत आल्या. म्हणाल्या, 'खोलीला कुलूप आहे. अजून बंदच आहे.'

'मग इतका वेळ तुम्ही कुठें होतांत?'

'शेजारच्या घरांत बसून राहिलें होतें. शेजारच्या बाईला विचारलं तर ती म्हणाली, 'त्यांचा कांहीं नेम नसतो. केव्हांहि येतात केव्हांहि जातात. काय करतात देव जाणे. पण बाई, तुम्ही कोण त्यांच्या?' अशी शरम वाटली म्हणतां मनूताई. पण सांगितलं खरं तें. म्हटलं, मीं बायको आहे त्यांची. चार वर्षांत तोंड दिसलं नव्हतं; तें काल दिसलं. नवऱ्याला घेऊन जायला आलें आहें.' तर ती बाई म्हणाली, 'उगाच खोटं कशाला सांगायचं तुम्हांला? त्यांना कर्ज आहे. घेणेकरी सारखे हेलपाटे मारीत असतात. आणि हे तोंड चुकवीत असतात. ते काय तुम्हांला भेटणार?'

'मग आतां?' मीं विचारिलें.

'आतां काय? त्यांनीं सोडलं म्हणूनं मला सोडतां येत नाहीं त्यांना. गांठून विचारलं पाहिजे कर्ज किती आहे तें.'

'मग काय कराल तुम्ही?'

'काय दोन दागिने आहेत ते देऊन टाकीन. मग तरी कळेल त्यांना कीं अखेर वेळेला बायकोच उपयोगी पडते. मग तरी येतील कीं नाहीं?'

मीं मान हलविली. चंपूताई पुढें म्हणाल्या, 'आतां दोन वाजले कीं जाणार आहे. गांठ घेतल्याशिवाय सोडत नाहीं.'

चंपूताई पुन्हां उन्हाच्या जळत पोळत बाहेर पडल्या आणि संध्याकाळीं दिवे लागून गेल्यावर परत आल्या. बरोबर कुणी पुरुष माणूस होता. त्याला बसायला सांगून चंपूताईंनीं त्याची–माझी ओळख करून दिली. चंपूताईंचा नवरा दिसायला बरा होता. पण पिंगट डोळ्यांतला तो उग्र भाव आणि उगाचच फार वाढविलेले ते लांब केस...... त्याचे ते कडक इस्त्रीचे कपडे कर्जबाजारी माणसाला शोभेसे नव्हते. आपण कांहीं अपराध केला आहे हें त्याच्या गांवीहि नव्हतें. चंपूताईंच्या गळ्यांत केवळ मंगळसूत्रच दिसलें आणि हातांत फक्त कांचेच्याच बांगड्या दिसल्या तेव्हांच मीं ओळखिलें कीं कर्ज फिटलें आहे. तोंच चंपूताई म्हणाल्या, 'यांना मुद्दामच तुमचं घर दाखवायला घेऊन आलें. काल सांपडलं नाहीं म्हणे.' आणि त्या उगीचच हंसल्या. मी चहा करायला आंत गेलें. त्याच्यासाठीं नाहीं तरी चंपूताईंसाठीं करायला हवा होता.

इकडे चंपूताईंनीं फराळाचा डबा उघडिला. लाडू–चिवडा बशींत घालून नवऱ्याला दिला. मी चहा घेऊन गेलें तेव्हां चंपूताई त्याला म्हणत

होत्या 'तुमच्यासाठीं मुद्दाम करून आणला लाडू–चिवडा, रवा घरीं दळला. म्हटलं फार आवडतात तुम्हांला.'

तो नुसता हंसला. बोलला नाहीं कांहींच. आणि थोड्या वेळानें जायला उठला. बायकोला म्हणाला, 'येतेस ना माझ्याबरोबर?' बोलण्यांत हुकमत होती. उगाचच जोर होता.

'हो. येते ना.' चंपूताई लगबगीनें म्हणाल्या. आणि मला सांगून त्या त्याच्याबरोबर गेल्या.

सकाळीं चंपूताई घरीं आल्या तेव्हां त्यांचा चेहरा प्रसन्न दिसत होता. त्यांची लगबग, त्यांचें बोलणेंचालणें सगळें सगळें पुन्हां उत्साही झालें होतें. वाटलें कीं हरविलें होतें तें बहुधा त्यांना सांपडिलें होतें. या बाईनीं काल आपल्या नवऱ्याला शिव्या दिल्या हें आज मला खरेंच वाटत नव्हतें. जवळपास कोणी नाहीं असें पाहून त्या मला म्हणाल्या, 'तसें ते चांगले आहेत हो. भोळे आहेत. मनांत कांहीं नसतं त्यांच्या. मुद्दाम कांहींच करीत नाहींत ते. काल सगळं कबूल केलं त्यांनीं माझ्याजवळ. आतां परवांच्या संध्याकाळच्या गाडीनं जाणार आम्ही. दुपारीं येणार आहेत मला न्यायला. म्हणाले, आपण सिनेमाला जाऊं. तुम्हांला कसा वाटला त्यांचा स्वभाव?'

'दोन मिनिटांत मला काय समजणार? तुम्हांला त्यांचा सहवास आहे. तुम्हांलाच नाहीं का अधिक कळणार?'

'पण तुम्हांला वाईट वाटले का ते तसे?'

'छे! वाईट कशाला वाटतील?'

मग दुपार झाली आणि चंपूताई यजमानांची वाट बघूं लागल्या. वारंवार खिडकीबाहेर पाहूं लागल्या. त्यांना कांहीं सुचत नव्हतें. ते आले कीं वेळ मोडूं नये अशा बेतानें त्या तयारीत होत्या. पण संध्याकाळ उलटून गेली तरी यजमानांचा पत्ता नाहीं. चंपूताई पुष्कळ चडफडल्या—तडफडल्या ! रात्रींचीं जेवणें आटोपलीं. आणि आम्ही अंथरुणें घालूं लागलों. चादर झटकतां झटकतां चंपूताई म्हणाल्या, 'पुन्हां तोंड बघणार नाहीं त्यांचं. लायकीच नाहीं त्यांची. बायको म्हणजे पाला–पाचोळा वाटतो त्यांना. आतां आले तर साफ सांगेन कीं गाढवपणा केला आणि तुमची भेट घ्यायला आलें. पुन्हां यायची नाहीं. ते आले पायां पडायला तरी जायची नाहीं त्यांच्या बरोबर. एव्हांना एखादं जरी मूल झालं असतं तरी त्याच्यांत जीव रमवला असता. पण नशिबांत हवं ना ? '

एकाएकीं कोणीं तरी दरवाजा वाजविला. चंपूताईंचे यजमान विठोबासारखे दारांत येऊन उभे राहिले होते. ते आंतसुद्धां आले नाहींत. तिथूनच करड्या आवाजांत म्हणाले, ' यायचं आहे ना तुला ? '

' हो. आलेंच. ' चंपूताईंचा ताठ आवाज त्या दोन शब्दांनीं इतका लवचिक, मऊ कसा झाला तें मला समजलेंच नाहीं. मी आश्चर्य करितें आहे तोंच त्या मला म्हणाल्या, ' मी जरा जाऊन येतें हं यांच्याबरोबर. '

——आणि त्या बोलतां बोलतां नवऱ्याबरोबर निघून गेल्या. मीच मूढासारखी जागच्याजागीं उभी राहिलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चंपूताई आल्या. माझ्यासमोरची भाजी आपणहि निवडायला घेऊन त्या म्हणाल्या, ' काल त्यांना वेळच झाला नाहीं यायला. मीच आपली घायकुती आहें. काल मग रात्रीं आम्ही सिनेमाला

करीत चंपूताईंनीं सामान आंत ठेविलें. आणि माझ्यासमोर बसून त्या धापा टाकूं लागल्या. कपाळावरची शीर टरटरून फुगली होती. आणि चेहऱ्यावरची कातडी अधिकच तापल्यासारखी झाली होती. चंपूताई वाळल्या होत्या; थकल्या होत्या. आणि एकंदरींतच त्यांची दशा झालेली दिसत होती. अंगावरचें लुगडें जागजागीं शिवलेलें होतें आणि विटून गेलेल्या पोलक्याची शिवण खांद्यावर उसविली होती. काय बोलावें तें मला सुचेना. प्यायला पाणी दिलें. आणि जेवाणाखाण्याची चौकशी करूं लागलें. पण तहानभूक विसरून चंपूताई अटीतटीनें म्हणाल्या, ' त्यांची गांठ घेतल्याशिवाय जेवांयचं नाहीं अशी शपथ खाऊनच घरून निघालें आहे. वर्ष व्हायला आलं, इथें आलें होतें त्याला. तेव्हां जें आमच्या यजमानांचं तोंड बघितलं आहे त्यावर या दहा महिन्यांत पुनश्च दर्शन नाहीं. '

' म्हणजे म्हणतां काय तुम्ही चंपूताई? अहो, ते तुमच्याबरोबर घरीं ना आले होते?'

' कुठचे घरीं येताहेत? वाट बघा नुसती. बारा वडावरचा मुंजा असतो, तसे आहेत ते. कुठून गांठ पडली आणि या गृहस्थाघरची बायको झालें! अहो, त्या दिवशीं त्यांनीं मला मोटारींत बसविली आणि ती सुटायच्या ऐन वेळीं आपण खालीं उतरले. '

' पण त्यांचं सामान?'

' सामान कुठचं आलंय? मीं विचारलं दोनचार वेळां तर धापा मारल्या मला. सामान नाहीं न् गडी नाहीं. आणि मला एकटीला दिली बसवून. तेव्हांपासून जें तोंड काळं केलं आहे...वाटतं कीं पुन्हां म्हणून नांव घेऊं नये. पण मीच वाईट आहें. मीच गाढव आहें. लाळघोटयासारखी पुन्हां आलें त्यांचा तपास काढायला.'

चंपूताईंनीं जरासुद्धां विश्रांति घेतली नाहीं. जशा पाऊसपाणी न बघतां आल्या.तशा ऊनतहान न बघतां पुन्हां आल्या.

' जरा ऊन खालीं होऊं दे मग जा. ' मी म्हणालें.

' अशीं कैक उन्हं वाळून गेलीं आणि कैक पावसाळे भिजून गेले मनुताई. पण माझ्या संसाराचं जें एकदां तापत्रय ह्यांनीं करून टाकलं आहे त्याला शेवट म्हणून नाहीं ! पण मी म्हणतें, मीं काय पाप केलं आहे? माणसासारखी माणूस आहे ना मी ? दोन हात, दोन पाय, नाकडोळे जिथल्या तिथें आहेत ना ? कां वेडी–खुळी आहे ? भटाभिक्षुकाची मुलगी करायची नव्हतीत. माझ्या बापाचे हजार रुपये पाण्यांत वितळले. मरतांना हजार रुपये मला देऊन गेला म्हणून ओलं–कोरडं खातें आहें. फाटकं–विटकं नेसतें आहे. मागल्या वेळीं यांना दोन दागिने होते ते देऊन टाकले. म्हटलं कर्ज फिटल्यावर तरी येतील. निदान माझ्या त्यागाची तरी ह्यांना किंमत वाटेल. पण बाईच्या त्यागाचीं फळें म्हणे पुढल्या जन्मीं येतात. असा संताप येतो ! एखादं मुलबाळ असतं तर ? पण नशिबांत ह्वं ना ? '......बोलतां बोलतां त्या पुन्हां उसळून म्हणाल्या, ' बायको मेली कां जिवंत आहे याचा तपास तरी कधीं केला आहे का ? चांगला कान पिरगाळतें आणि विचारतें....'

'पण त्यांचा पत्ता ? पत्र पाठवतात कां कधीं ?' मीं विचारिलें.

'हं ! पत्र पाठवताहेत ! वाट बघा नुसती. एवढें सरळ सूत असतें तर भुतासारखे कशाला वागले असते ? पण मला आहे त्यांचा पत्ता माहीत– नसला तरी,मी शोधून काढीन ! म्हणून तर आलें आहे. मागल्यासारखी आतां फसायची नाहीं. त्यांना घेऊन जायलाच आलें आहें. गडी नाहीं

अन् सामान नाहीं. उचला सामान अन् बसा गाडींत असं करीन. त्यांना आधीं बसवीन आणि मग मी बसेन. समजलांत ?'

मीं मनांत म्हटलें, 'मी समजून काय उपयोग ? ज्याला समजायचें त्याला समजलें पाहिजे.'

चंपूताईंनीं केंस विंचरिले. लुगडें सारखें केलें आणि डाव्या पायावरचा घोळ उजव्या पायापर्यंत घोळवीत त्यांची ती उंच, किरकोळ, पोक आलेली, घट्ट पण मोठ्या आंबाड्याची आकृति रस्ता चालूं लागली. त्यांनीं खरेंच कांहीं खाल्लें नाहीं. मला त्यांची दया आली. बघितल्याबरोबर लोभ वाटावा, प्रेम वाटावें असें देवानें त्यांना कांहीं दिलें नव्हतें. पण कोणालाहि दया वाटावी, आंतडें हलावें असा त्यांचा आटापिटा मात्र होता. ज्यांत जीवनच नाहीं असलें जीवन त्या जगत होत्या ! अगदीं सामान्य माणसाला-सुद्धां जगायला एखादें सुखाचें स्वप्न हवें असतें. स्त्रीचें स्वप्न तिचा नवरा असतो. त्यानें दिलें तर सुख; नाहीं दिलें तर तिच्यासारखी दरिद्री स्त्री या दुनियेंत कोणी नाहीं ! चंपूताईंचें जीवित जसें कांहीं कोणी तरी चोखून शोषण करून घेत होतें. अशी ही एकाकी, उजाड होऊन गेलेली एक सामान्य स्त्री स्वप्न दिसावें म्हणून वेडीपिशी झाली होती. फाटक्या लुगड्यानें त्यांचा लांकूडफांट्यासारखा देह जेव्हां तडफडत रस्ता चालूं लागला तेव्हां एखाद्या उजाड माळावर एखादें बाभळीचें झाड खराटा होऊन पडलें असावें तसें मला वाटलें.

संध्याकाळीं दमून-भागून चंपूताई घरीं आल्या. त्यांना पत्ता सांपडला होता पण भेट झाली नव्हती. नुसत्या चहाच्या पाण्यावर त्यांनीं संध्याकाळ घालविली. आणि रात्रीं त्या पुन्हा बाहेर पडूं लागल्या. त्यांना काय म्हणावें तेंच मला समजेना ! मीं विचारिलें, 'कोणाला सोबत देऊं का बरोबर ?'

'नको' असें आपल्याच नादांत म्हणून त्या बाहेर पडल्या. आत्तां माझ्या सहज ध्यानांत आलें. चंपूताईंच्या पायांत कांहींच नव्हतें. कोंकणांतून आल्या त्याच अनवाणी पायानें. भटाभिक्षुकाची मुलगी असली तरी गृहस्थाघरीं फाटकें लुगडें, अनवाणी पाय, उसविलेलें पोलकें असलें कांहीं तिचें व्हायला नको होतें. पण तिच्या नशिबाची घडण बनविणारा तिचा नवरा, त्याला त्याचें कांहींच वाटत नव्हतें !

रात्रभर चंपूताई घरीं आल्या नाहींत. मीं काळजी करीत होतें. पण बहुधा पत्ता सांपडला होता. नवराबायकोची गांठ पडली होती.

कारण सकाळीं चंपूताई नव्या चेहऱ्यानें घरीं आल्या. तेंच जुनें विटकें लुगडें, तेच अनवाणी पाय ...... पण चेहरा मात्र बदलला होता. आल्यावर मला म्हणाल्या, 'मीं उगाचच कधीं कधीं रागावतें ह्यांच्यावर. पुष्कळ पैसे मिळवावेत म्हणून तर त्यांनीं निरनिराळे उद्योग केले पण सगळे मेले अंगाशीं आले. कर्ज फेडल्याशिवाय तर तिकडे येतां येत नाहीं ? म्हणाले, 'मला लाज वाटते तिकडे यायचीसुद्धां.'

'मग तुम्ही काय म्हणालांत ?' मीं विचारिलें.

'मी म्हणालें, माझ्याजवळ आहेत अडीचशें तीनशें रुपये ते तरी देऊन टाका. तेवढाच भार कमी होईल. आतां आज दुपारीं येणार आहेत. अहो, त्यांच्या जीवाला जर घोर असला तर मला तरी काय सुख आहे ?'

'तें खरं. पण एवढे पैसे दिलेत म्हणजे तुमच्याजवळचे सगळे पैसे संपले का ?'

'इतकी मी भोळी नाहीं बरं मनुताई. खाली मुंडी अन् पाताळ–धुंडी आहें मी. मीं यांना सांगितलं कीं इथं आणले आहेत तेवढे पैसे

देईन. भाडयाला आधीं माझ्यासाठीं काढून ठेवीन. तिकडं गांवीं आहेत त्यांतल्या एका पैला हात लावणार नाहीं. तुम्हांला लावूं देणार नाहीं.'

मी कांहींच बोललें नाहीं. दुपारीं त्यांच्या जीविताचा धनी आला. त्याचें चहापाणी झालें. चंपूताईंनीं या वेळीं त्याच्यासाठीं नारळाच्या वडया आणिल्या होत्या. त्या देऊन झाल्या. त्याच्यांत मात्र मला काडीचा फरक दिसला नाहीं. तोच उग्र चेहरा. तीच गुटगुटीत अंगलट. आणि तेच कडक इस्तरीचे कपडे. हा माणूस कर्जबाजारी आहे हें सांगणाऱ्याला शपथच घ्यावी लागली असती. चंपूताईंची ती कपडयालत्त्यांची दुर्दशा, देहाची ती अवहेलना आणि या गृहस्थाघरच्या माणसाची ती बाळसेदार शरीरयष्टि, गरम कोटाचा दिमाख आणि पॉलिश केलेले चकचकीत बूट..हे दोघे नवराबायको आहेत हें त्यांनीं स्वतःच सांगितल्याशिवाय खरें वाटलें नसतें. या माणसाशीं बोलावें अशी इच्छा मला झाली नाहीं. मी स्वयंपाकघरांतच बसून राहिलें. त्याला चहा देण्याचें माझ्या मनांत नव्हतें. पण चंपूताईसाठीं दिला.

त्यांचें काय बोलणें झालें तें देवाला माहीत कीं त्यांनाच माहीत. पण तो जेव्हां जायला निघाला तेव्हां चंपूताई मला म्हणाल्या, 'मी जाऊन येते ह्यांच्याबरोबर. कदाचित् रात्रींसुद्धां येणार नाहीं.'

'पण पैशाचं काय झालं ?'

'दिले ना त्यांना.'

'बरं उद्यां येणार ना सकाळीं ?'

'येणार ना म्हणजे काय मनुताई ? तुमच्याशिवाय तोलायला मला तरी कोण आहे ?'

असें म्हणून त्यांनीं तोंड धुतलें. डाळिंबाच्या दाण्याएवढें कुंकू लाविलें. आणि मुद्दाम विकत आणलेली पावडर पिठासारखी त्यांनीं सगळ्या चेहऱ्याला लाविली. नाक, कान, गाल सगळ्यावर ती दिसत होती. त्यांचें आटोपलें आणि ती विजोड जोडी बाहेर पडली.

दुसऱ्या दिवशीं चंपूताई माझ्या घरीं आल्या. त्यांचा चेहरा बदलला होता. कपाळावरची शीर कुठें गुप्त झाली होती. आणि चार वर्षांनीं त्या लहान झाल्या होत्या. जसा चेहरा बदलला होता तसें लुगडेंसुद्धां बदललें होतें. नव्या नवरीनें लगीनसाडी नेसावी तसें तें लुगडें त्यांना वाटत होतें. तापलेल्या भूमीवर पर्जन्यधारा पडून ती शांत व्हावी तशा चंपूताई तृप्त झाल्या होत्या. तें लुगडें माझ्यापुढें धरून त्या म्हणाल्या, ' पाहिलंत का कसं आहे पोत? रंग आवडला तुम्हांला? काल ह्यांनीं घेतलं मला. '

' आणि ह्याच्या जोडीला ? '

' जोडीला नाहीं घेतलं. '

' एकच लुगडं पुरतं का तुम्हांला ! '

' एक कसं पुरेल हो मनुताई ? पण एक तर एक. एक तरी कधीं घेतलं होतं ? पण काल फार वाईट वाटलं ह्यांना. मग हें लुगडं आणलं.'

' पण पोलकी ? आणि पैसे तुमचेच ना ?

' अहो, माझं काय आणि त्यांचें काय ? ते आणि मी दोन आहोंत का ? ताटांत सांडलं काय आणि वाटींत सांडलं काय ? पण ते मला व्याज देणार आहेत. मीं म्हटलं मला तुमच्याकडून व्याज काय करायचं आहे ?

नवऱ्यानं बायकोला व्याज द्यायचं असं कांहीं कुठें ऐकलं नाहीं बाई. पण ते म्हणाले, कर्ज काढलं असतं तर द्यावंच लागलं असतं ना ? आणि शिवाय माझे पैसे परत देणार आहेत ते.'

'तुम्हांला खात्री आहे ?'

'हो.' मान वांकडी करून चंपूताई बोलूं लागल्या. 'ह्या वेळीं कांहीं म्हणा मनुताई, पण ते निवळले आहेत. या खेपेलाहि वाटलं होतं कीं त्यांच्याशीं भांडावं लागेल. आरडाओरडा करावा लागेल. कपाळसुद्धां फोडून घ्यावं लागेल. कारण ह्यांनीं मला मागल्या वेळीं फसवलंच कीं नाहीं ? आतां नवरा म्हणून आपण बायकांनीं तसं म्हणायचं नाहीं. पण मला फसवलंय्. पण मला बघितल्यावर ते विरघळतात बघा. आपली बायकोच अखेर आपल्या उपयोगी पडते हें पटलं आहे त्यांना आंतून. आणि माझंहि मेलीचं काय होतं समजत नाहीं. ते हुकंमत गाजवतात आणि मी ऐकतें. हुरळून जातें जशी कांहीं. आतां आज येणार आहेत मला न्यायला. मग उद्यां–परवां आम्ही जाणार आहोंत. म्हणाले, कामें आटोपतों इथलीं. आणि मग इथून जें एकदां जायचं तें पुन्हां म्हणून तोंड दाखवायचं नाहीं.'

पण तो माणूस कांहीं त्या दिवशीं त्यांना न्यायला आला नाहीं. चंपूताई वाटेकडे डोळे लावून बसल्या होत्या. त्याचें जग कोठें होते आणि तो कोठें वावरत होता तें त्यालाच माहीत ! पण तो म्हणजे चंपूताईंचें विश्व होतें. तो आला नाहीं कीं त्यांचें विश्वच हरवून जात होतें. काडीचाहि आधार देत नसलेला हा माणूस दृष्टीआड झाला कीं चंपूताईंना विलक्षण निराधार वाटे. पोहायला येत नसलेल्या दुबळ्या माणसाला महापुरांत सोडून दिलें तर त्याचें जें होत असेल तें चंपूताईंचें होई ! एवढा परावलंबी जीव पराकाष्ठेचा निराधार करून जगांत पाठवून देणाऱ्याचें मला आश्चर्य वाटत होतें. आपण निराधार आहोंत कीं नाहीं हें त्यांचें त्यांनाच कळत

नव्हतें. पण त्याच्या कोटाची बाही घट्ट धरून ठेविण्यासाठीं चंपूताई दारापर्यंत हेलपाटे घालीत होत्या. आणि अखेर रात्रीं त्या निराश होऊन बसल्या. पाहातां पाहातां त्यांच्या कपाळावरची शीर तटतटून फुगूं लागली. आणि मनांतलें दुःख सतापाच्या रूपानें बाहेर पडूं लागलें. 'काय वाटतं हो यांना ? काय वाटतं ? तुम्ही नाचवाल तशी मी नाचेन होय ? उगीच खोटं कशाला बोलावं ? माणसाला विनाकारण वाट पाहायला लावायची. भटाभिक्षुकाची मुलगी असलें म्हणून यांनीं असं करावं काय ? ह्या यांचा गृहस्थपणा ! गृहस्थाघरचीं माणसं अशीं वागतात वाटतं ? आम्ही आपले गरीब भिक्षुकच बरे म्हणायचे. माझ्या वडिलांनीं माझ्या आईला कधीं असा त्रास दिला नाहीं. पण ह्यांचं बघा एकेक. एक–एक लक्षण धड नाहीं. सदा खोटं बोलायचं. जन्मभर खोटं वागत आले. स्वतःचा जीव स्वतःची चैन. कधीं दुसऱ्याचा विचार केला आहे का ? लग्न झालेलीं माणसं एकमेकांसाठीं करतात. स्वतःसाठीं नाहीं करत. माणसाला कधीं एकट्यानं बसून खाता आलं आहे का ? आलं असतं तर मीं नसतं कां खाल्लं ? पण मला तें जमत नाहीं जनावरासारखें. आमच्या कोंकणांत म्हण आहे मनुताई, साप म्हणूं नये धाकला आणि नवरा म्हणूं नये आपला. आतां आलें तर तोंड पाहाणार नाहीं त्यांचं. जा म्हणावं कुठें मसणांत जातां तें.'

मी कांहीं बोललें नाहीं. त्यांच्याबरोबर मीहि अस्वस्थ होण्यापलीकडे कांहीं झालें नाहीं. जगांत कांहीं कांहीं गोष्टींवर इलाजच नसतो–उपायच नसतो. असें जेव्हां होतें तेव्हां माणूस नुसता तडफडतो. आंतल्याआंत जळून जातो. मग कधीं रागावितो, त्रागा करितो, कधीं केविलवाणा होतो आणि अखेर थकून जातो. खोटीच आशा दाखवून चंपूताईंच्या थकल्या जीवाला आणखी निराधार करण्याचें पाप मीं केलें नाहीं. रात्रीं जेवायच्या वेळीं चंपूताईंनीं अंथरूण घातलें. मी त्यांना म्हटलें, 'जेवायला चला चंपूताई.'

'नको.'

'चला हो. असं काय करतां ?'

'मी नाहीं जेवणार आज. मला जेवावंसंच वाटत नाहीं.'

'पण थोडंसं खा.' मी त्यांना आग्रह करूं लागलें.

'नाहीं हो, माझी भूकच मरून गेली आहे.'

'पण तरीसुद्धां थोडंसं खा. तुम्ही कां आपले हाल करून घेतां ?'

'या जेवणांत कसलं सुख आलं आहे मनुताई ?'

सुख नव्हतें खरेंच, पण सुख नसलेल्या कित्येक गोष्टी माणसाला केवळ जीवंत राहाण्यासाठींच कराव्या लागतात. 'तुम्ही जेवलां नाहींत तर मीहि जेवणार नाहीं.' असें म्हणतांच चंपूताई घळाघळां रडूं लागल्या. माझेहि डोळे भरून आले. माझा हात धरून थरथरत्या अंगानें त्या म्हणाल्या, 'हें जें तुम्ही करतां ना, तेंच त्यांनीं माझ्यासाठीं करावं असं वाटतं मला. पण तुम्ही असं वागलांत म्हणजे मला रडूं येतं; आणि ते असं वागतील तर मला सुख होईल. पण ते वागायचे नाहींत कधीं. काळीज कुठें आहे त्यांना ? आणि कोणाच्या तरी ऐवजीं कोणी तरी वागून असं चालत नाहीं, नाहीं का ? असं कां हो देवानं केलं आहे ?'

'देव असं कां करतो आणि त्यांत त्याला कसला आनंद वाटतो त्याचा शोध लागला नाहीं अजून चंपूताई' असें म्हणून मीं पार्टे [illegible]लीं. पण चंपूताईंचा प्रत्येक घांस डोळ्यांतल्या पाण्यांनीं ओला होत होता.

दुसरा दिवस गेला. तिसरा गेला. चंपूताईंनीं घरीं बसूनच नवऱ्याची वाट पाहिली. आपण त्याला शरण जावयाचें नाहीं असें त्यांनीं

ठरविलें होतें. पण तो शरण येणारा माणूस नव्हता. शरण आणणारा होता. गरज त्याला नव्हती. चंपूताईंना होती. त्यांनींसुद्धां निष्फळ आशेची मोट बांधिली, आणि त्या पुन्हां त्याच्या खोलीवर गेल्या.

आणि मग त्यांचे सारखे हेलपाटे सुरू झाले. त्या केव्हांहि गेल्या तरी त्यांच्या खोलीला कुलूपच असे. तो या गांवांत तरी होता कीं नाहीं यांचीच मला शंका येऊं लागली. चंपूताई रोज मोठ्या आशेनें बाहेर पडत आणि रोज निराशेनें परत येत. असे तीन-चार दिवस गेले. आणि एक दिवस मग चंपूताई ज्या सकाळीं गेल्या त्या दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत परत आल्या नाहींत तेव्हां मीं ओळखिलें कीं, चंपूताईंचा नवरा सांपडला आहे. सकाळीं चंपूताई मोठ्या उत्साहानेंच परत आल्या. त्यांनीं सामान सोडिलें. पुन्हां बांधलें. फराळाचा डबा पुन्हां घांसून पालथा घातला. पैसे दहा वेळां मोजून पाहिले, पुन्हां जागच्याजागीं ठेविले. आपल्या एकुलत्या एक नव्या लुगड्याची घडी त्यांनीं हलक्या हातानें घातली. आणि त्या मला म्हणाल्या, ' एकदां इथनं गांवीं पोंचलों कीं गंगेंत घोडे न्हाले. '

' कधीं जायचं ठरलंय ? '

' आजच जाणार आहोंत. ह्यांनीं मला सामानाची तयारी करून ठेवायला सांगितली आहे. आतां बाहेर जाऊन थोडी साखर, चांगलासा चहा, थोडीं बिस्किटं घेऊन येणार आहें. ह्यांना जरा चहाची खोड आहे. मला म्हणतात, काढ्यासारखा चहा करीत जाऊं नकोस. अलीकडे इथें पुण्या-मुंबईला राहिलेले हे. ह्यांना अधूनमधून पाव-बिस्किटं खावींशीं वाटणारच कीं. मी काय मेली, तिकडे फार तर थिरडं आंबोळी घालून देईन. पण ह्यांना नको का आवडायला ? अहो, ह्यांना पाहून हे कोकणचें

आहेत असें कोणी तरी म्हणेल का ? कसे साहेबासारखे दिसतात कीं नाहीं ? मी आपली म्हणतें, आपलं माणूस, आपणच जपायला नको का ? '

' खरें आहे. ' पण खरें काय आणि खोटें काय तें मला समजलें नव्हतें !

चंपूताईंनीं स्नान केलें. आपलें तें जुनें फाटकें लुगडेंच त्या जरा ठाकठिकीनें नेसल्या. उसविलेल्या पोलक्याला त्यांनीं चार टाके मारिले आणि पिशवी घेऊन त्या बाहेर पडल्या.

जेवायच्या वेळेला परत आल्या. पेपरमिंटचा एक पुडा माझ्या मुलाच्या हातांत देत त्या म्हणाल्या, ' मी आपली आठ आठ दिवस रहाते तुमच्या घरीं. लाज वाटते मला. पण माझ्या संसाराचें हें वाळवण पडलं आहे ना; त्यामुळें राहावं लागतं. '

' मग राहा ना तुम्ही ' मी म्हणालें, ' तुमचा कधीं कंटाळा केला आहे का मी ? तुमचं एकदां मनासारखं झालं म्हणजे मलासुद्धां बरं वाटेल. तुम्ही संकोच करूं नका. '

' तसं नव्हे पण या दिवसांत....आणि मी इकडची काडी तिकडे-सुद्धां करीत नाहीं. रागावूं नका गरीबावर आज आतां आम्ही जाणार. हे एकदां माझ्याबरोबर आले कीं मी पावन झालें. सोळा सोमवार करतें आहें. उद्यापनाला तुम्ही याल का माझ्या गरीबाच्या घरीं ? '

' येईन ना. तुमचं लागीं लागूं दे. ' मी म्हणालें.

आणि मग हळूं हळूं जायची वेळ होत आली. चंपूताईचें केव्हांच आवरिलें होतें. सामान आधींच दारांत जाऊन पडलें होतें. आणि खिड-कीशीं उभ्या राहून त्या आपल्या नशीबाची वाट पाहात होत्या.

पण आज नशीब जोरावर होतें. चंपूताईंचे यजमान टांगा घेऊन वेळेवर हजर झाले. ते म्हणाले, 'झाली का तयारी?'

'हो. पण तुमचें सामान कुठें आहे?'

ते दारांत उभे होते ते आंत येऊन खुर्चीवर बसले. 'हें बघ इकडे ये. तुला दाखवितोंच आतां.' त्यांनीं खिशांतून एक कागद बाहेर काढिला. आणि तो इंग्रजी कागद त्यांच्यापुढें धरून ते म्हणाले, 'वाचून बघ. आजची तारीख आहे. मला आज निघतां येत नाहीं. तुला बसवून देतों. आणि उद्यां नाहीं तर परवांच्या मोटारनं मी येतों.'

'मग मीसुद्धां उद्यां किंवा परवांच येतें ना तुमच्याबरोबर.

'मी काय सांगतों आहे तें ऐकूं येत नाहीं का तुला?' एखाद्या बोक्या-सारखे अंगावर गुरकावून ते म्हणाले, 'माझं ऐकायचं नाहीं? काल काय कबूल केलंस मला?'

'पण तुम्हीसुद्धां माझ्याबरोबर यायचं कबूल केलं होतंत.' चंपूताई कावऱ्याबावऱ्या होत म्हणाल्या.

'मग मी कुठं-नाहीं म्हणतों आहे? येईन ना. जरा दोन-चार दिवस मागें पुढें.'

'मी पण राहातें तितके दिवस इथें.'

'आतां लागलंय कीं काय तुला? उगाच आपलं घरदार सोडून इथं तरीहि घरीं आठन् आठ दिवस राहायचं म्हणजे काय? चल. सामान आल्या. त्यां मी येतों पोंचवायला.'

'आतां एकदमच पोंचवा मला.' असें पुटपुटत चंपूताईंनीं फराळाचा डबा उचलिला. पुन्हां तो त्यांच्यापुढें करीत त्या म्हणाल्या, 'ह्यांत चहा, साखर, बिस्किटं आहेत. तो डबा घेऊन जा तुमच्याबरोबर.'

'इथं काय बिस्किटांना तोटा केला आहे, कीं मी लहान मूल आहे म्हणून खाऊ देते आहेस मला ?' मोठमोठ्यानें हंसत त्यांनीं ट्रंक–वळकटी उचलिली. आणि रडव्या केविलवाण्या चेहऱ्यानें चंपूताई नवऱ्याच्या मागोमाग टांग्यांत जाऊन बसल्या. डोळे भरून आले होते, विलक्षण निराधार वाटत होतें तरी त्यांनीं त्याच्या कोटाची बाही हातांत घट्ट धरून ठेविली होती. आणि तो त्यांच्या शेजारीं पायावर पाय टाकून ऐटींत बसला होता.

० ० ० ०

एक वर्ष उलटलें. या वर्षांत चंपूताईंच्या जगांत काय उलथापालथ झाली होती तें मला समजलें नव्हतें. उन्हाळे–पावसाळे येत जात आले आहेत. आणि अलिप्तपणानें अनंत जीवनें पाहात आले आहेत. त्यांनीं कधीं कोणाच्या जीविताची चौकशी केली नाहीं. आणि याचाच अवलंब चंपूताईंनींहि केला. पावसापाण्याची चौकशी त्यांनींहि कधीं केली नाहीं. ऋतु कोणता आहे याची परवा न करितां त्या नवऱ्याची चौकशी करायला येत राहिल्या. तशा त्या आतां पुन्हां आल्या. मागल्या वर्षींचेच दिवस होते. चंपूताई आणखीच कवकवीत, अशक्त झाल्या होत्या. अंगावरची शीरन् शीर टरटरली होती. चेहऱ्यावरचें कातडें आणखीच ताणलें गेलें होतें. आणि हाडांचा सांगाडा उरला होता. [illegible]च कल [illegible] तीच ट्रंक–वळकटी आणि तोच फराळाचा डबा घेऊन त्या आल[illegible] नेहमींप्रमाणें त्यांच्या जन्माचें पुराण सांगून झालें. वहिवाटीप्रम[illegible] गेला. दुसरा नवऱ्याच्या घरीं हजार हेलपाटे घातले. आणि तिकडे कोंकणांत[illegible]हून थकल्यावर शिल्लक होते त्याचेंहि दान सोडून त्या नवरा प्रसन्न होण्याची [illegible]

लागल्या. ज्या दिवशीं त्यांनीं त्याला पैसे दिले त्या दिवशीं रात्रीं तो त्यांना घेऊन गेला. सकाळीं जेव्हां त्या परत आल्या तेव्हां एक वारभर कापड आणि हातांत सोन्याच्या ...... मीं निरखून पाहिलें. त्या पितळेच्या बांगड्या होत्या. त्यांनाहि त्याचा अस्सलपणा माहीत होता. म्हणून त्यांनीं मला कांहीं दाखविलें नाहीं. पण त्यांचा चेहरा टवटवीत झाला होता. मीं नुसतेंच विचारिलें, 'काय म्हणतात तुमचे यजमान ?'

'या वेळीं येतों म्हणताहेत.' मीं विचारितांच चंपूताईंना बोलावेंसें वाटूं लागलें. 'म्हणतात, तुझं माझ्यावर खरं प्रेम आहे. तूंच माझ्या उपयोगी पडतेस. त्यांना माझ्याबद्दल वाटत नाहीं असं नाहीं. काल मला ते सिनेमाला घेऊन गेले होते. दर वेळींच नेतात. असंच एक दिवस त्यांना जास्त जास्त पटेल आणि मग येतील माझ्याबरोबर. नाहीं का ?'

मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांचे हेलपाटे, एखादा दिवस राहाणें चाललें होतें. मग एक दिवस त्या मला म्हणाल्या,

'आज आम्ही जाणार आहोंत.'

'बरं.'

'इकडेच येईन म्हणाले आहेत.'

'बरं.'

[...]मी बाहेर जाऊन थोडं सामान आणतें आणि मग ...'

मीं 'बरं' म्हणालें. चंपूताई चहा-बिस्किटाचे पुडे घेऊन [...]तीं सामान बांधिलें व त्या तयारींत राहिल्या.

पण दोन वाजले....तीन....चार....साडेचार झाले तरी तो घेऊन जाणारा आला नाहीं. मग चंपूताईंची घालमेल सुरू झाली रस्ता न्याहाळणें, दारापर्यंत हेलपाटे मारणें....मीं मनांत म्हटलें, हें असें किती वर्षें चालावयाचें आहे ? ज्या गोष्टींत कांहीं घडत असतें तिचा शेवट केव्हां ना केव्हां कसा ना कसा होत असतो. पण जेथें कांहीं घडतच नाहीं तिचा शेवट....चंपूताईंच्या ठिकाणीं भविष्याचा वेध देण्याची शक्ति असती तर ? त्यांची ही धडपड स्वतःचें प्रेत स्वतःच हलवून पाहावें तशी भयंकर केविलवाणी वाटली. चंपूताई फेऱ्या घालीत होत्या म्हणजे वेदना तळमळत होत्या ! चंपूताई घड्याळ पाहात होत्या म्हणजे काळ त्यांच्या वेदनांची लांबीरुंदी मोजीत होता ! आणि त्या भावड्या जीवाला कोणत्याहि लांबी-रुंदीची कल्पना येत नव्हती ! अज्ञानांत सुख असतें असें म्हणतात; पण जेव्हां अज्ञानच रडूं लागतें तेव्हां ज्ञानी माणसाच्या यातना शतपटीनें वाढतात. एकदां वाटलें, कीं चंपूताईंना सगळें समजावून सांगावें. पाठीला कणा नसलेल्या माणसासारखें वागूं नका, असें म्हणावें. त्यांचा पाणउतारा करून त्यांच्या स्वाभिमानाला डिवचावें. पण चंपूताई स्वयंभू अज्ञानी होत्या. त्यांना थोडें जरी समजत असतें तरी त्यांनी एकदां तरी शंका घेतली असती. एक तरी हेलपाटा कमी मारिला असता. पण तसें होत नव्हतें. त्या पुन्हां पुन्हां रस्ता न्याहाळून बघत आणि पुन्हां पुन्हां त्याच्या पावलांचा आवाज ऐकण्यासाठीं दारापर्यंत हेलपाटा मारीत. मीं म्हटलें, 'ते येणार आहेत याची खात्री आहे तुम्हांला ?'

'अहो हो. न येऊन सांगतात कुणाला ? क[illegible] आहे त्यांनीं....'

त्यांनीं मलाच मूर्ख ठरविलें. पण तो दिवस तसाच [illegible] गेला. तिसरा गेला. आठ दिवस गेले. बाट पाहून प[illegible]

चंपूताई मग त्याच्या खोलीकडे पुन्हां हेलपाटे मारूं लागल्या. सकाळच्या वेळीं त्या बाहेर पडत तेव्हांच तो टांगेवाला आपलें तट्टू टांग्याला जुंपून घेऊन जाई. तें तट्टू आणि या चंपूताई....कशाला तरी जुंपल्यासारख्या त्या बाहेर पडण्याची ओढ घेत......चंपूताईंची ती कृश, चेहऱ्यावरून कातडें ओढून धरलेली, श्रमून गेलेल्या छोटघाशा डोळघांत अजून आशा धरून राहिलेली लांकूडफाटघासारखी मूर्ति जेव्हां फाटकें-विटकें नेसून अनवाणी पायानें बाहेर पडे तेव्हां मी रोज म्हणे, याला शेवट नाहीं. याला अंत नाहीं. किंवा याचा शेवट कधींच झाला आहे! याचा अंत पूर्वींच होऊन चुकला आहे!! पण या भोळघा-भाबडघा आशाळभूत जीवाला हें कोणीं समजावून सांगावें ?

—आणि मला एकाएकीं वाटलें कीं मीच अज्ञानी आहे. तो सिनेमा, ती रात्र....
